नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०४ बुधवार, दि. ०४ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334


# 'क्लिन प्लांट'अंतर्गत तीन केंद्र उभारणार

## केंद्रीय मंत्री चौहान; 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन'चा पारितोषिक वितरण सभारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

**पुणे : महाराष्ट्र हे देशातील फलोत्पादनाचे मुख्य केंद्र आहे. इथल्या शेतकऱ्यांनी आपल्या परिश्रमाने आणि नाविन्यपूर्ण कल्पना राबवून या क्षेत्रात प्रगती केली आहे. फलोत्पादनासाठी रोपवाटीकेतून मिळणारे रोप रोगमुक्त असावे आणि शेतकऱ्यांना लाभ देणारे असावे यासाठी 'क्लिन प्लांट' कार्यक्रम देशात राबविण्यात येईल. शेतकऱ्यांची गरज आणि क्षमता लक्षात घेवून देशात यासाठी ९ केंद्रे उभारण्यात येतील आणि त्यातील ३ केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले.**



वातावरणाच्या पार्श्वभूमीवर शेती क्षेत्रासमोर अनेक समस्या असताना शेतकऱ्याला साहाय्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा एकमात्र उपाय आहे. पुणे ॲग्री हॅकॅथॉनमधील उपयुक्त तंत्रज्ञानाचे इन्क्युबेशन करणे आणि हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पहिल्या 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन'च्या पारितोषिक वितरण आणि समारोप सभारंभात ते बोलत होते. कृषी महाविद्यालय येथील सिंचन नगर मैदानावर आयोजित या कार्यक्रमास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, प्रभारी पान ४

कृषी विभागाने राज्यातील विविध भागात असे हॅकॅथॉन आयोजित करावे, अशी सूचना करून फडणवीस म्हणाले, देशातील सर्वाधिक ३० ते ३२ टक्के स्टार्टअप्स कृषी क्षेत्राशी निगडीत आहे आणि त्यातील सर्वाधिक स्टार्टअप्स महाराष्ट्रातील आहेत. पुणे ॲग्री हॅकॅथॉनमध्ये प्रदर्शित शेती क्षेत्रातील बदल परिसरातील शेतकऱ्यांना दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले.

### क्लिन प्लांट इनिशिएटीव्ह-क्रॉप कव्हरसाठी प्रयत्न

देशाच्या फलोत्पादन निर्यातीत महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या क्लिन प्लांट इनिशिएटीव्हमधील अधिकधिक केंद्र महाराष्ट्राला द्यावे. वातावरण बदलामुळे कृषी क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत आहे. केंद्र-राज्य शासन मिळून क्रॉप कव्हरच्या क्षेत्रात योजना आणता आली तर राज्य सरकारची सकारात्मक भूमिका राहील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत सर्वाधिक केंद्र राज्यात

द्राक्षाचे केंद्र पुणे येथे, संत्र्यासाठी नागपूर येथे आणि डाळींबासाठी सोलापूर येथे सुरू करण्यात येईल. त्यासाठी एकूण ३०० कोटी रुपये खर्च करण्यात येतील. या केंद्राच्या आधारे महाराष्ट्राचे फलोत्पादन क्षेत्र जगात आघाडी घेईल, असा विश्वास कृषी मंत्री चौहान यांनी व्यक्त केला.

# 'संजीवनी'कडून चमकणारे तारे घडविण्याचे कार्य

## स्नेहलता कोल्हे; तालुक्यातील दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** ज्ञान हा प्रत्येकाचा दागिना आहे. दहावी-बारावी शिक्षण घेवून अभियांत्रिकी तांत्रिक शिक्षणातून जगाच्या पाठीवर चमकणारे तारे घडविण्याचे काम माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी संजीवनी एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून केले, असे प्रतिपादन माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी केले.

संजीवनी उद्योग समुह व संजीवनी युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने तालुक्यातील दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार काल, मंगळवारी संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयात झाला. त्याप्रसंगी त्या अध्यक्षपदावरून बोलत होत्या.

याप्रसंगी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेबरोबरच सरस्वती पुजन करण्यात आले.

संजीवनी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकुर म्हणाले की, तंत्रज्ञान वेगाने विकसीत होत असून स्टार्टअप इंडियासह देश-विदेशातील औद्योगिकीकरणाला कोणत्या पद्धतीचे अभ्यासक्रम हवे आहेत, त्याचा पाया संजीवनी विद्यापीठात घातला जात आहे. मुला-मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यांचे शिक्षण येथे दिले जाते. दहावी-बारावीनंतर काय याबाबत उच्च दर्जाचे मार्गदर्शन आणि ज्ञान शिकविले जाते.



### तीस वर्षापासून हा उपक्रम सुरू

संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांच्या संकल्पनेतून तीस वर्षापासून हा उपक्रम सुरू असल्याचे सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी सांगितले.

प्रारंभी संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्तविकात म्हणाले की, ग्रामीण भागातील मुला-मुलींना के. जी. पासून पी. जी पर्यंत तसेच पीएच.डीचे दर्जेदार शिक्षण पान ४

# स्व. मुंडेंचे विचार सदैव सोबत : ना. मुंडे

## गोपीनाथगडावर बहीण-भाऊ एकत्र; कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**परळी :** भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचा काल ११ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने परळीतील गोपीनाथगडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या विशेष दिवशी एक ऐतिहासिक क्षण पाहायला मिळाला, पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी तब्बल ११ वर्षांनी एकत्र गोपीनाथगडावर हजेरी लावली.

राज्याच्या राजकारणात मोठे लक्ष वेधून घेतलेल्या या उपस्थितीमुळे गोपीनाथगडाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले होते. मंत्रीपद गमावल्यानंतर धनंजय मुंडे काय बोलणार याकडे विशेष लक्ष होते, मात्र त्यांनी या कार्यक्रमातही माध्यमांशी संवाद टाळला. दुसरीकडे, पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेतल्या, आणि कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवले.



पंकजा मुंडे म्हणाल्या, धनंजय मुंडे यांना विचारले मात्र ते म्हणाले, आमच्या सगळ्यांच्या वतीने तूच बोल. आजपर्यंत मला साथ दिलेल्या, जीवनामध्ये मी माझ्या पायांवर उभे राहत असताना ज्यांनी ज्यांनी मला साथ दिली, पाठीशी उभे राहिले त्यांचे मी हात जोडून मी आभार व्यक्त करते. हे एक कुटुंब आहे. दरवर्षी काय करावे असा प्रश्न पडतो. ज्या बापाला जखम झाली म्हणून कळले असते. तर या देशात इतक्या लोकांनी रक्त दिले असते. त्याचा एक इतिहास तयार झाला असता. त्याच आठवणीत मी रक्तदान शिबीर घेते, मी देखील इथे रक्तदान करते. पान ४

# संशोधकांची रिक्त पदे भरा

## मा. खा. तनपुरे यांची उपमुख्यमंत्री पवारांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी शहर :** राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील संशोधकांची रिक्त असलेली पदे तात्काळ भरावी, अशी मागणी माजी खा. प्रसाद तनपुरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

माजी खा. तनपुरेंनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यातील कृषि संशोधनासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या चारही कृषि विद्यापीठांच्या सद्यस्थितीसंबंधी काही बाबी निदर्शनास येतात. कै. पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या संकल्पनेतून देशातील प्रत्येक प्रांतात कृषि क्षेत्राचा विकास करण्यासाठी कृषि क्षेत्रातील उत्पन्न वाढीसाठी तसेच कृषि



मालाचा दर्जा वाढविण्यासाठी एक कृषि विद्यापीठ निर्माण करण्यात आले. सुदैवाने महाराष्ट्र राज्याचा विस्तार व विविध भौगोलिक परिस्थिती यामुळे चार कृषि विद्यापीठांची निर्मिती करण्यात आली. या विद्यापीठातील संशोधन कार्यामुळे राज्यातील शेती विकासाला निश्चीतपणे गती मिळालेली आहे. हे निर्वीवाद सत्य आहे.

परंतू अलीकडील काळामध्ये काही कारणांमुळे संशोधन, विस्तार व शिक्षण या त्रिसूत्री कार्यक्रमात शैथील्य आलेले आहे. हे नाकारता येणार नाही. १९६८ साली राहुरी येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना झाली. सुमारे साडेसात हजार एकर सर्व प्रकारची जमीन. ऊस, कपाशी, गहु, ज्वारी, हरबरा यासारख्या पिकांना भारी जमीन, पोयट्याची जमीन, फळबागासाठी मुरमाड तर मेंढी व शेळी पालनासाठी खडकाळ जमीन, मुळा धरणातून बारा महिन्यांसाठी २५० दशलक्ष घनफूट पाण्याची सोय, वीजेची प्रचंड उपलब्धता, भरपुर सुर्यप्रकाश, सर्वात महत्वाचे म्हणजे या तालुक्यातील जनतेने संशोधनासाठी अत्यावश्यक असलेली राजकीय पान ४

# सच्चा नेता हा परिवर्तनचा शिलेदार : सौ. विखे

## शेतकरी नेते संतोष रोहम यांचा आ. खताळ मित्र मंडळाकडून गौरव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** शेतकऱ्यांच्या हितासाठी आपले सर्वस्व पणाला लावणारे शेतकरी नेते संतोष रोहोम यांना दृष्टी नसली तरी त्यांच्याकडे असलेल्या दृष्टीकोनाला समाजाने पाठींबा दिला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मदतीने जगण्याची उमेद मिळालेला एक सच्चा नेता हा या परीवर्तानचा शीलेदार असल्याचा गौरव जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यानी केला.

संगमनेर शहरातील मालपाणी लॉन्स येथे आ. अमोल खताळ मित्र मंडळाच्या वतीने शेतकरी नेते संतोष रोहम यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या गौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ नेते दशरथ सावंत, नीलम खताळ, बापुसाहेब गुळवे, वसंतराव गुंजाळ, सुदाम सानप, डॉ. अशोक इथापे, भाजप अध्यक्षा पायल ताजणे, श्रीकांत गोमासे, गुलाब भोसले, हरिश्चंद्र चकोर, वैभव लांडगे, शिवसेनेचे विठ्ठलराव घोरपडे, रामभाऊ राहणे, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, जनार्दन आहेर, आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार, रौफ़ शेख, बंडूनाना देशमुख यांच्यासह तालुक्यातील महायुतीचे कार्यकर्ते, महिला, युवक, जेष्ठ नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सौ. विखे पाटील म्हणाल्या की, संतोष हे नावच पान ४

संतोष रोहोम म्हणजे राजकीय, सामाजिक चळवळीत नेतृत्व करणारे व्यक्तिमत्व आहे. अनेक आंदोलनात त्यांच्या समवेत सहभागी झालो. खूप काही शिकायला मिळाले. आलेल्या दिव्यांगावर मात करून त्यांनी मला विधानसभेच्या निवडणुकीत केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांच्या संकल्पनेतील विकासाची प्रक्रीया तालुक्यामध्ये राबविताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याचे काम पूर्ण केले जाईल. अतिशय संकाटाच्या काळात रोहोम यांची पत्नी आणि मुलांनी त्यांना दिलेला आधार कौतुकास्पद आहे.

**- अमोल खताळ, आमदार**

# वांगदरी घरकुल प्रकल्पास प्रथम क्रमांक

## केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान; ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना मिळाले मोठे यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** वांगदरी ग्रामपंचायतीने उभारलेल्या 'महाआवास घरकुल प्रकल्पास' राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला असून, हा सन्मान बालेवाडी, पुणे येथील भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, तसेच इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



हा प्रकल्प सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे आणि जिल्हा परिषद माजी सभापती, जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली साकार झाला आहे.

श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी मोशीन मालजपते, सरपंच संजय नागवडे आणि ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुरकुटे यांनी मिळून हा पुरस्कार स्वीकारला.

ग्रामपंचायतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाची ४० गुंठे जागा विशेष प्रयत्न करून हस्तांतरित करून घेतली आणि त्यावर दर्जेदार स्लॅबयुक्त ३६ घरांची निर्मिती केली. एकूण प्रकल्पासाठी १ कोटी २० लाख रुपये खर्च झाले असून, यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतून आणि गवंडी प्रशिक्षण योजनेतून ८५ लाख, रेल फॉर फाउंडेशनतर्फे २२.५० लाख रुपये निधी प्राप्त झाला. उर्वरित रक्कम राजेंद्र नागवडे यांच्या माध्यमातून तसेच ग्राम पंचायतीच्या इतर निधीमधून उभी करण्यात आली.

सदर प्रकल्पास यापूर्वी विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कारही मिळालेला आहे. आता राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाल्याने वांगदरी गावाच्या वैभवात मोठी भर पडली असून, संपूर्ण गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. सर्व स्तरातून ग्रामपंचायतीचे व नागवडे कुटुंबियांचे अभिनंदन होत आहे.

ग्रामपंचायतीने अतिशय बारकाईने लक्ष देऊन स्लॅबच्या ३६ घरकुलांचे अतिशय दर्जेदार व सर्व वीज, पाणी, शौचालय इत्यादी सुविधांनियुक्त चांगले काम करून घेतले आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे पाठबळ मिळालेले आहे.

सदर प्रकल्पासाठी एक कोटी २२ लाख ५० हजार रुपये खर्च झाला असून प्रधानमंत्री आवास योजनेतून व गवंडी प्रशिक्षण योजनेतून रुपये ८५ लाख निधी प्राप्त झालेला आहे. सदर कामाकरिता पुणे येथील रेल फॉर फाउंडेशन यांनी २० लाखाचा निधी दिलेला आहे. उर्वरित रक्कम राजेंद्र दादा नागवडे यांनी उपलब्ध करून दिली असून काही रक्कम सरपंच संजय नागवडे यांनी ग्रामपंचायतीचे इतर फंडातून खर्च केलेले आहेत.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, तालुक्याचे माजी आमदार बबनराव पाचपुते तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकारी व पदाधिकारी यांचे या कामी मौलिक सहकारी लाभले.

### पुरस्कार शिवाजीराव बापूंना समर्पित

सरपंच संजय नागवडे यांनी सांगितले की, स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या विचारांचा व संस्काराचा वारसा घेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली. आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी यांनी विशेष मेहनत घेतली. हा पुरस्कार स्व. शिवाजीराव बापूंना समर्पित करताना त्यांनी संपूर्ण गावाच्या वतीने आनंद व्यक्त केला.

## संमिश्र

### महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याच्या प्रस्तावर शिक्काम ोर्तब केले. मंत्रिमंडळाने या आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चासही मान्यता दिली आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या या निर्णयाचा राज्यातील लाखो नागरिकांना लाभ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मंत्रिमंडळाने कुर्ल्यातील मदर डेअरीची जागा धारावी प्रकल्पाला देण्याच्या निर्णयावरही शिक्कामोर्तब केले आहे.

### हगवणे पिता-पुत्रांना न्यायालयीन कोठडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** वैष्णवी हगवणे प्रकरणातील आरोपी सासरा राजेंद्र हागवणे आणि दीर सुशील हगवणे याला १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तर या प्रकरणातील आरोपी असलेल्या निलेश चव्हाण याला ७ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### आंदोलनकर्त्याने चक्क सोडले विंचू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छ. संभाजीनगर :** कोळी समाजाच्या विविध मागण्यांबाबत सिल्लोडच्या उपविभागीय कार्यालयाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत, धाडस संघटनेचे आकाश पाडळे यांनी सोमवारी कार्यालयात विंचू सोडले. त्यामुळे त्यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणला म्हणून गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया सिल्लोड शहर पोलिस ठाण्यात उशिरापर्यंत सुरू होती.

### बिहारमध्ये वादळामुळे ७ जणांचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**इंफाळ:** २९ मे रोजी देशाच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये मान्सूनचे आगमन झाले. ५ दिवस उलटूनही मान्सून अजूनही तिथेच अडकलेला आहे. त्यामुळे मणिपूर, आसाम, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय, मिझोराम आणि सिक्कीममध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. आसाममधील २२ जिल्ह्यांतील १२५४ गावांमधील ५.३५ लाखांहून अधिक लोक पुरामुळे बाधित आहेत.



# मनपा कर्मचारी पतसंस्थेला ६९ लाखांचा नफा

## सभासदांना ११ टक्के डिव्हिडंट वाटपाला मंजुरी : विकास गीते

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन विकास गीते यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. पतसंस्थेला चालू वर्षी ६९ लाख रुपये नफा झाला असून सभासदांना ११ टक्के डिव्हिडंट वाटपाला मंजुरी देण्यात आली. पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी नेहमीच सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले असल्यामुळे पतसंस्था यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन चेअरमन विकास गीते यांनी केले.



> सभासदाच्या आजारपणाचे तातडीने निदान व्हावे, यासाठी २५ हजार रुपयाची आर्थिक मदत केली जाते यावर्षी १ लाख २५ हजार रुपयाची मदत झाली आहे. तसेच ९ मयत सभासदांचे कर्ज निवारण निधीतून कर्जरूपी ८ लाख ८ हजार २०० रुपये माफ केले आहे. याचबरोबर सभासद निर्वाण निधीतून १० मयत सभासदांच्या वारसांना प्रत्येकी १० हजार रुपयाची आर्थिक मदत केली आहे.
>
> **– बाबासाहेब मुदगल**

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन विकास गीते समवेत व्हाईस चेअरमन उषाताई वैराळ, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, कैलास चावरे, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचलिक प्रमिलाताई पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी, संतोष गवळी आदी सभासद कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब मुदगल म्हणाले की, पतसंस्थेने नेहमीच सभासदांच्या अडी-अडचणीच्या काळात नेहमी उभे राहण्याचे काम केले आहे. सभासदांच्या मुला-मुलींचे शिक्षण, लग्न समारंभ यासाठी आर्थिक कर्जरूपी मदत केली आहे. यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उषाताई वैराळ यांनी सभासदांचे आभार मानले.

# माजी मंत्री थोरातांचा जनतेशी सातत्याने संवाद

## बाळासाहेब थोरात लोकांचे प्रश्न लावताहेत मार्गी ; नागरिकांत समाधान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** साहेब, आमचं काम बघा , या कार्यक्रमाला यायलाच पाहिजे, फोन लावा, मदत पाहिजे, अशा असंख्य हाका, अपेक्षा आणि विश्वास आजही संगमनेरच्या माजी आमदार व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याभोवती फिरताना दिसत आहेत. काही महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास आणि आपलेपणा तसाच कायम आहे. नेत्याचा पराभव झाला, पण माणूस हरलेला नाही हेच चित्र संगमनेर तालुक्यात ठिकठिकाणी दिसून येते.

राजकीय पराभवानंतर अनेक नेते काही काळ विश्रांती घेतात, काही ठराविक मंडळींमध्येच दिसतात, पण बाळासाहेब थोरात यांनी मात्र उलट मार्ग निवडला. निवडणुकीत मतांनी मागे पडले, पण मनाने ते जनतेच्या अजून जवळ गेले. लोकांच्या अडचणी ऐकण्यासाठी त्यांचे यशोधन कार्यालय नेहमीप्रमाणे खुले आहे. तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून शेकडो लोक आजही या कार्यालयात आपल्या अडचणी घेऊन येतात आणि त्यांना तितक्याच आपुलकीने उत्तर दिलं जातं.



> ### लोक सतत संपर्कात राहतात
> माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाने साखर कारखाना, दूध संघ, बाजार समिती, शेतकी संघ, अमृतवाहिनी बँक यांसारख्या अनेक संस्था बळकट केल्या आहेत. त्या माध्यमातून आजही ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, व्यापारी वर्ग थेटपणे जोडलेले आहेत. त्यामुळे त्यांची मदत मागण्यासाठी किंवा मार्गदर्शन घेण्यासाठी लोक सतत त्यांच्या संपर्कात राहतात.

> ### नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करा
> अवकाळी पावसाने आणि वादळी वाऱ्यांमुळे अनेक शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांचीही पडझड झाली आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्वरित प्रशासनाशी संपर्क साधून नुकसानग्रस्त भागांचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे.

> ### थोरात यांनी विविध मंत्री पदे संभाळली
> थोरात यांनी कृषी मंत्री पदाची जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे सांभाळली असून त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांसाठी अनेक उपयुक्त योजना राबवण्यात आल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात त्यांच्या नशिबावर सोडणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावेत, अशी मागणी करत त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या कार्यालयातून नागरिकांचे प्रश्न सुटत आले आहेत. जमीन मोजणी, वीज जोडणी, सरकारी योजना, आरोग्यविषयक मदत, शैक्षणिक मार्गदर्शन, कुठलाही विषय असो, साहेब बघतील हा विश्वास आजही जनतेच्या मनात आहे. म्हणूनच कोणतेही काम असो, थोरात यांना फोन किंवा आमंत्रण देणे हे अनेकांसाठी आवश्यक बाब ठरते.

# वडूले खुर्दमध्ये होळकर जयंती उत्साहात

## आशाबाई तुतारे व इंदुबाई आव्हाड अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित




**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** तालुक्यातील वडूले खुर्द येथे पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी गावच्या लोकनियुक्त सरपंच मीराबाई आव्हाड अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी ग्रामपंचायत वडूले खुर्द तर्फे पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्काराच्या मानकरी गेली ३६ वर्ष ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविका इंदुबाई आव्हाड व आशा कर्मचारी आशाबाई तुतारे यांना पुण्यश्लोक राष्ट्रमाताअहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रोख रक्कम व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच या वेळी आरोग्य कर्मचारी आशाताई बडे यांची खात्यांतर्गत कोपरगाव येथे बदली झाल्याने त्यांनाही सन्मानित करुन निरोप देण्यात आला. तसेच यावेळी सरपंच आव्हाड यांच्या हस्ते पंचायत समिती पर्यवेक्षका सुनिता साळवे, आशा कर्मचारी ताराताई आव्हाड, रंजना रणमले, उपसरपंच रेणुका आव्हाड, ललिता मिसाळ,मंदा दहिफळे, उज्वला आव्हाड, आशाबाई गिते, सुनिता शिरसाट,रंजना काळपुंड यांनाही सन्मानित करण्यात आले.

यावेळी भाऊसाहेब आव्हाड, तात्याबा तुतारे, रामदास पांढरे, विष्णूदास आव्हाड, मल्हारी आव्हाड, कानिफनाथ आव्हाड, गणेश मिसाळ, दादासाहेब गाडेकर, दिलीप आव्हाड, रमेश आव्हाड, चेअरमन, विठ्ठल आव्हाड, अमोल आव्हाड, योगीराज आव्हाड, मनोज बोरा, सतीश सोनवणे, सतीश आघाव, बापूसाहेब तुतारे, प्रदिप आव्हाड, सुरेश मेजर, गोकूळ नागरे, सचिन काळपुंड यांच्यासह ग्रामस्थ व युवक मित्र उपस्थित होते.यावेळी पंचायत समिती पर्यवेक्षिका सुनिता साळवे, सुरेश आव्हाड, प्रदिप आव्हाड यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्हारी आव्हाड यांनी केले. तर आभार रामदास पांढरे यांनी मानले.

# महाराष्ट्राच्या गड किल्ल्यांचा इतिहास चित्रातून मांडला

## डॉ. कमर सुरुर; ठाकूरदास परदेसी यांचे गडकिल्ले चित्र प्रदर्शन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** गड किल्ल्यांचा संपूर्ण देशाला मोठा इतिहास आहे. जुने तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी राजे महाराजे यांनी बांधलेले महाल किल्ले एक उत्तम साधन आहे. अशा या वास्तूंची भ्रमंती करून ठाकूरदास परदेसी यांनी महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचा सौंदर्य आपल्या कॅमेऱ्यात कैद करून तो चित्राच्या रूपाने आपल्यासमोर मांडला आहे, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर यांनी केले.



मख़दुम सोसायटी, रहमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने अहमदनगर शहराचे ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्रातील दोनशे पेक्षा जास्त गड किल्ल्यांची भ्रमंती करणारे ठाकूरदास परदेसी यांच्या चित्रांचे प्रदर्शन सर्जे पुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

> प्रदर्शन नेहमी आयोजित होणे गरजेचे आहे. यामुळे नवीन पिढीला आपला इतिहास जाणून घ्यायची संधी मिळते व ज्यांनी प्रत्यक्ष गड किल्ले बघितले नाहीत ते या चित्रांचे माध्यमातून व त्यांच्या संग्रहकाकडून बरीच माहिती मिळवता येते.
>
> **– डॉ. कमर सुरुर**

याप्रसंगी डॉ. कमर सुरुर, बोलत होत्या यावेळी रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, संध्याताई मेढे, क्वाईन संग्रहक सचिन डागा, पंकज मेहेर, डॉ. परवेज अशरफी, मुस्कान असोसिएशनचे शफकत सय्यद, फिरोज शेख, आर्किटेक फिरोज शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले. तर आभार शफकत सय्यद यांनी मांनले.

# मार्केटयार्डमधून मोपेडची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील मार्केट यार्डच्या भाजी मार्केट मधील गाळा नं १८ समोर हँडेल लॉक करुन लावलेली मोपेड (क्र. एम एच १६ डी डी ७१२३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना २ जून रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. गणेश भैरुलाल कांकरिया यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ‘मराठा’ आचारसंहितेचे मराठा भगिनींकडून स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** मराठा समाजाच्या लग्नासाठी समाजातील विचारवंतांकडून एक आदर्श आचारसंहिता तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डिजेच्या तालावर, अश्लील गाणी व संगीताच्या तालावर नाचणारे युवक युवतींना समज द्यावी.

भोजनातील पदार्थांची संख्या मर्यादित असावी. वधु-वर पित्यांशिवाय इतरांना फेटे न बांधने, अनावश्यक सत्कार सोहळे बंद व्हावेत. वरमाला घालतांना वधुवरांना न उचलणे तसंच लग्नाचा अव्वाच्या सव्वा खर्च टाळणं, हुंडा न देणं, हुंडा घेणाऱ्यावर बहिष्कार टाकणं आणि सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करणं अशा प्रकारचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



> सर्व नियम व घालून दिलेल्या आचारसंहितेचा सर्व विभागात सन्मान राखावा असे आवाहन मराठा समाजातील भगिनींनी सर्व समाज बांधवांना केले आहे. ही लग्नासाठीची आचारसंहिता एक चळवळ म्हणून उभी करण्याचा मानस आहे.
>
> **–विमल पुंडे, योग शिक्षिका**

विमलताई पुंडे, रोहिणी पुंडे, कमल नरोडे, आरती गाडे, मंगल खोकले, रुपाली महाडिक, शिल्पा पुंडे, संगिता नरोडे, पुष्पाताई जगताप, कल्पना मोरे, पुनम रक्ताटे, सोनल हिरे आदी मराठा भगिनी यासाठी प्रयत्नशील आहेत.

# सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारीपदी राहुल फसले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** तालुक्यातील ढोरजळगाव येथील सुपुत्र राहुल बाळासाहेब फसले यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या २०२३ सालच्या राज्यसेवा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या महत्त्वाच्या पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या घवघवीत यशामुळे ढोरजळगावसह संपूर्ण शेवगाव तालुक्यात आनंदाची लाट पसरली आहे.

राहुल फसले यांचे प्राथमिक शिक्षण ढोरजळगाव येथे तर उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी पुणे येथे मॅकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली. पदवी शिक्षणानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली.

प्रारंभी दोन वेळा मुख्य परीक्षा व मुलाखतीपर्यंत पोहोचूनही अपयश आलं, मात्र खचून न जाता अधिक जोमाने तयारी करत त्यांनी मागील वर्षी सहायक कक्ष अधिकारी पदावर यश मिळवलं आणि सध्या मुंबईतील मंत्रालयात कार्यरत आहेत.



> ### दिग्गज मान्यवरांकडून फसलेंवर शुभेच्छा
> फसले यांच्या निवडीबद्दल माजी आ. नरेंद्र घुले, चंद्रशेखर घुले, आ. मोनिका राजळे, खा. निलेश लंके, प्रतापराव ढाकणे, हर्षदाताई काकडे, बापूसाहेब पाटेकर, डॉ. सुधाकर लाडे, राजेंद्र देशमुख, डॉ. नामदेव दौड, संभाजी लाडे आदी मान्यवरांनी शुभेच्छा देवून अभिनंदन केले आहे.

या यशानंतरही त्यांचा अभ्यास सुरूच राहिला आणि अखेर २०२३ च्या राज्यसेवा परीक्षेत सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या प्रतिष्ठेच्या पदासाठी त्यांची निवड झाली. राहुल फसले यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. अपयशानंतर हार न मानता सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

# मनीषा घोरपडेंना अहिल्याबाई होळकर पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वैजुबाभुळगाव येथे कर्तबगार महिलांना भगीनींना अहिल्याबाई होळकर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

राधाकृष्ण महिला बचत गटाच्या अध्यक्षा मनिषा किशोर घोरपडे पाटील यांना व कमलबाई सुरेश आठरेया दोन कर्तबगार महिलांना गावच्या सरपंच ज्योतीताई संतोष घोरपडे व उपसरपंच मनेश बाबासाहेब घोरपडे यांच्या हस्ते सन्मान पत्र ,सन्मान चिन्ह, शाल व श्रीफळ रोख रक्कम देण्यात आली.




बचत गटाच्या माध्यमातून मनुष्या घोरपडे यांनी ग्रामीण भागात उत्कृष्ट काम केले असून अनेक महिलांना त्यांनी स्वतःच्या पायावर उभे केले. तसेच कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी मोठे काम केले आहे.

या पुरस्कार सोहळ्यासाठी ग्रामसेवक गिरीश उगार, संतोष घोरपडे, कमलताई गायकवाड, सिंधुताई गायकवाड, वंदना घोरपडे, पुजा घोरपडे, लता गुंजाळ, मनिषा घोरपडे, सविता गरड, वच्छला जरे, लताबाई घोरपडे, धनंजय आठरे, सुरेश ठोबे उपस्थित होते.

# जनसेवक बाळकृष्ण गांडाळ यांना मातृशोक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे पश्चिम भागातील विश्वासू युवक कार्यकर्ते तथा यशोधन कार्यालयातील जनसेवक बाळकृष्ण पांडुरंग गांडाळ यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई गांडाळ यांचे वृद्धपकाळाने निधन झाले आहे. मृत्यू वेळी त्यांचे वय ७५ वर्षे होते.



सावरचोळ च्या मेंगाळवाडी येथील अत्यंत गरीब कुटुंबातून आलेले पांडुरंग गांडाळ यांनी आपला मुलगा बाळकृष्ण याला संस्कार व शिक्षण दिले त्या माध्यमातून बाळकृष्ण याने आदिवासी समाजातून मोठे युवक संघटन केले आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तो सेवाभावी काम करत आहे. यशोधन कार्यालयात कार्यरत असताना काल बाळकृष्ण गांडाळ यांचा वाढदिवस होता मात्र दुर्दैवाने त्याच दिवशी त्यांच्या मातोश्रींचे वृद्ध काळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा बाळकृष्ण काशिनाथ व तीन मुली सुना नातवंडे असा परिवार आहे.

# ...अखेर आ. शिवाजीराव कर्डिलेंच्या पाठपुराव्याला यश

## संजय गांधी निराधार अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा ; चार महिन्यांपासून लाभार्थी होते वंचित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान डी.बी.टी.च्या तांत्रिक अडचणीमुळे गेल्या ४ महिन्यापासून लाभार्थी वंचित होते. त्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबतची सर्व माहिती आमदार शिवाजीराव कर्डिले यांना सांगितल्यानंतर त्यांनी तातडीने संजय गांधी शाखेचे नायब तहसीलदार गणेश भांनवसे यांच्याशी संपर्क साधू लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून त्यांचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश दिल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात हे अनुदान संजय गांधी योजनेच्या ११० लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचा क्षण पाहायला मिळाला.



आ. कर्डिले यांनी नेहमीच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला असल्याचे प्रतिपादन भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केले.

नगर तालुका तहसील कार्यालय येथे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी नायब तहसीलदार गणेश भांनवसे यांच्याकडे केली. यावेळी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, दरेवाडी ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल कराडे, बाबासाहेब धीवर, सुधीर देठे, खडसे पाटील आदीसह लाभार्थी उपस्थित होते.

> नगर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसणे, आधार बँकेला लिंक नसणे, आपल्या कोणत्या खात्याला आधार लिंक आहे व कोणता मोबाईल नंबर लिंक आहे ते माहीत नसणे. यामुळे तालुक्यातील ४० टक्के लाभार्थ्यांना पेन्शन जमा होण्यास साठी अडचण निर्माण होत होती. आता आ. कर्डिले यांच्या प्रयत्नातून लाभार्थ्यांच्या डी.बी.टी द्वारे खात्यात पैसे जमा होणार आहे.
>
> **– वसंत शिंदे, जिल्हाध्यक्ष : भाजप दिव्यांग आघाडी**

# शेतकऱ्यांच्या खात्यावर १०.६४ कोटी जमा

## आ. आशुतोष काळे यांची माहिती; ऊस उत्पादकांना दुसरा हफ्ता वर्ग; शेतकऱ्यांमध्ये आनंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर अर्थसहाय्य करण्याची मा. खा. कर्मवीर शंकररावजी काळे यांच्यापासून सुरू झालेली परंपरा आजतागायत कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने जपली असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वास संपादन केला आहे. हा विश्वास सार्थ ठरवतांना गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये कारखान्यास ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना १५० रुपये प्र. मे. टन ऊसदराचा दुसरा हप्ता व यापूर्वी जाहीर केलेले ठिबक सिंचनचे अनुदान ठिबक सिंचनने ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना १०० रुपये प्र. मे. टन अनुदान देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेवून सदरची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

> ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याची कर्मवीर शंकरावजी काळे यांची शिकवण व आदर्श विचारसरणी डोळ्यासमोर ठेवून माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ कारखान्याचे कामकाज करीत आहे. आगामी गळीत हंगाम २०२४-२५ करीता शेतकऱ्यांनी आपल्याकडील जास्तीत जास्त ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे.चालू वर्षी चांगले पर्जन्यमान होईल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे त्या शेतकऱ्यांनी आडसाली ऊस लागवडी कराव्या.
>
> **–आ. आशुतोष काळे**

यावर्षी गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये कारखान्याने प्रतिकूल परिस्थितीत १२१ दिवस चाललेल्या गळीत हंगामात ६ लाख ५८ हजार ५०० मे. टन ऊसाचे गाळप करून ७ लाख ३४ हजार ४५० क्विंटल साखर पोती उत्पादन घेवून चालू गळीत हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये ज्या शेतकऱ्यांनी ऊस पुरवठा केलेला आहे त्यांना पहिली उचल प्र.मे.टन रुपये २,८०० रुपये याप्रमाणे यापूर्वीच अदा करण्यात आलेली आहे.




जून महिन्यामध्ये खरीप हंगामाची सुरुवात होत असल्यामुळे शेतकऱ्यांना बी-बियाणे खरेदी करून पेरणी करता यावी तसेच मुलांच्या शाळा उघडल्याने वह्या, पुस्तके, खरेदीसाठी आर्थिक हातभार मिळावा, याकरिता द्वितीय हप्ता रक्कम रुपये १५० रूपये प्र. मे. टन देण्याचा व ठिबक सिंचन अनुदान १०० रू. प्र.मे. टन देण्याचा निर्णय नुकताच संचालक मंडळाने घेतला असून जवळपास १०.६४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले असल्याची माहिती आ. काळे यांनी दिली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रासह राज्यभर मे महिन्यात अवकाळी पावसाने लावलेली हजेरी त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक मदत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याने वेळेत दिल्यामुळे खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. जून महिन्यात शाळा महाविद्यालय सुरू होत असतात. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदीसाठी देखील मोठी मदत होणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# कंपनीच्या धुरामुळे प्रदुषणामध्ये वाढ!

## गावातील अनेक नागरिकांना जडले श्वसनाचे विकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील सुपा हे नगर- पुणे हायवे रोडवर वसले असुन त्या ठिकाणी ४० ते ४५ गावांचा दळणवळणाचा दरडोई संबध येत असुन सुपा पंचक्रोशीतील सुपा औद्योगिक वसाहत ही मोठ्या प्रमाणात वसली आहे. नवीन औद्योगिक वसाहत ही नगर- पुणे हायवे लगत आहे. परंतु या ठिकाणी असलेल्या एका कंपनीच्या धुरामुळे तेथील परिसरातील गावांचे जनजीवन अंधकारमय झाले आहे. या कंपनीच्या धुरामुळे परिसरातील वातावरण दुषित झाले आहे.

### कंपनीवर कारवाई करण्याची मागणी

या कंपनीवर कारवाई होण्यासाठी इंटरनॅशनल प्रेसचे पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र चितळकर व पारनेर तालुका माहिती सेवा समितीचे उपाध्यक्ष, पत्रकार राजकुमार इकडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व औद्योगिक वसाहतीचे अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाला निवेदन देऊन या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधून घेणार आहे.

या दुषित वातावरणामुळे प्रदुषणात वाढ झालेली आहे. याबाबत अनेक वेळा कंपनीला लेखी निवेदन देउनही काहीही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. इस्पात कंपनी ही नगर-पुणे हायवे रोड लगत असल्याने या कंपनीच्या धुरांमुळे वाहन चालकांना वाहने चालवतांना हायवे रोड दिसत नाही. त्यामुळे आपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. राजकीय नेत्यांना अनेक वेळा लेखी निवेदन देऊन ही कंपनीवर कोणतीच कार्यवाही झालेली दिसत नाही,राजकीय मंडळीनी तोंडावर बोट ठेवल्याचे चित्र दिसत आहे. धुरांमुळे श्वसन विकारांपासून ते अनेक आजारांना निमंत्रण दिल्यासारखे आहे.



# लोकनेते मुंडे यांना बोधेगावात अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्यावतीने मुंडे चौक बोधेगाव या ठिकाणी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेस सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक माधवराव दराडे व सुनील गर्जे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी आपल्या हयातीत शासन दरबारी होणारे निर्णय लोककल्याणकारी होते. त्यांच्या विचाराचा वारसा समाजाने जोपासायला हवा, असे यावेळी अभिवादनकर्त्यांनी आपलं मत व्यक्त केले.



यावेळी बोधेगाव विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन अनिल घोरतळे, व्हाईस चेअरमन प्रसाद पवार, मयूर हुंडेकरी, परमेश्वर झांबरे, गणेश उगले, रामानाथ थोरे, गणेश घोरतळे, अंकुश झांबरे, आबासाहेब ढेसले, माणिक गर्जे, प्रकाश गर्जे, आदिनाथ गर्जे, मुनावर शेख, अजीम पठाण, उमेश वाघ, गणेश गर्जे, अमोल शिरसाठ, गिरीश यादव, वैभव चेमटे, गोरख जायभाय उपस्थित होते.


या कार्यक्रमासाठी ग्राम पंचायत सदस्य माणिक गर्जे आणि माजी ग्रामपंचायत सदस्य प्रकाश गर्जे यांनी परिश्रम घेतले.

# आजपासून रंगणार देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धा

## मातीचे आखाडे सज्ज; तोडीस तोड मल्ल भिडणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** येथील खंडोबानगर मैदानावर आजपासून देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार रंगणार आहे. अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेव-गाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेच्या ठिकाणी दोन मातीचे आखाडे सज्ज करण्यात आले असून, प्रेक्षकांना बैठण्यासाठी गॅलरीची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे आणि जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष



पै. वैभव लांडगे यांनी दिली.

आज (दि. ४ जून) सकाळपासून कुस्तीपटूंचे वजन होणार आहे. तर सायंकाळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, राम महाराज झिंजुर्के व प्रशांत (नाना) भालेराव यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून, जिल्ह्यातून आलेल्या कुस्तीपटूंना राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अत्यंत नियोजनबध्दपणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेत लहान गटांपासून मोठ्या गटांपर्यंत एकूण ९ गटात मातीवर कुस्त्या होणार आहे. सर्व विजयी मल्लांसाठी भरघोस बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे.

# स्व. मुंडे यांचे पाथर्डीशी जिव्हाळ्याचे संबंध

## भगवान दराडे; मुंडे यांची पुण्यतिथी साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** स्व.गोपीनाथ मुंडे यांचे पाथर्डी तालुक्यावर त्यांचे विशेष प्रेम होते, ते प्रेमाने पाथर्डीला 'मावशी' म्हणायचे. स्थानिक कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांनी या भागात नेतृत्वाचा पाया भक्कम केला. त्यांचा सामान्य माणसाशी थेट आणि हृदयस्पर्शी संवाद होता. ते नेहमी जनतेच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी तत्पर म्हणून मुंडे यांना 'लोकनेते' अशी ओळख निर्माण झाली. असे प्रतिपादन 'उबाठा'चे तालुकाप्रमुख भगवान दराडे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील तिनखडी येथे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्यावेळी दराडे बोलत होते.यावेळी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी माऊली खेडकर, उमेश खेडकर, गणेश खेडकर, कानिफ आंधळे, अर्जुन नागरगोजे, नवनाथ खाडे, राहुल खेडकर, रवी खेडकर, संभाजी आंधळे आदी उपस्थित होते.



> माऊली खेडकर म्हणाले, स्व. गोपीनाथ मुंडे हे एक खऱ्या अर्थाने जनतेचे नेते होते. त्यांनी सामान्य माणसाच्या हितासाठी आयुष्यभर कार्य केले. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार आणि वंचितांसाठी त्यांनी अनेक योजना राबवल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी तालुक्यातील कार्यकर्त्यांना नेहमीच प्रोत्साहन मिळाले.

दराडे म्हणाले, स्व.मुंडे यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि लोकसेवेच्या व्रताने महाराष्ट्राच्या राजकारणात अमीट छाप सोडली. ऊस तोडणी कामगारांवर त्यांचा विशेष प्रभाव होता. त्यांच्या कार्यामुळे आणि प्रेमामुळे आजही ते प्रत्येकाच्या मनात जिवंत आहेत. त्यांचे विचार आणि कार्य आम्हाला नेहमीच प्रेरणा देत राहतील.

# प्रा. कवादांचे कायद्याच्या परीक्षेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** निघोज येथील प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद हे नुकत्याच झालेल्या कायद्याच्या एल. एल. बी. पदवी परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.



शेतकरी कुटुंबातुन शिक्षण घेतलेले प्रा. कवाद यांनी १२ वी पर्यंत शिक्षण निघोज येथे पुर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे घेतल्यानंतर शिवविचारांचा मनावर लहानपणापासूनच प्रभाव असल्याने शिवव्याख्यान देत असताना संजीवनी कालेज येथे शिक्षण शास्त्राची बीएड पदवी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये परीक्षा देवून विद्यापीठात बहि:शालचे वक्ते म्हणुन बहुमान मिळविला.

शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याबरोबर शिकण्याची जिद्द मनात ठेवून कायद्याची पदवी घेऊन कायद्यातील एल. एल. बी करण्याचे ठरविले व विशेष प्राविण्य मिळवत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होवुन वकिली क्षेत्रात काम करण्याची इच्छा पुर्ण केली. मुंबईमध्ये कस्टम मधील नोकरी ते पुणे विद्यापीठ वक्ते व एल. एल. बी. पर्यंतचा त्यांचा प्रवास युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# काटवन खंडोबा रोडवर पावसाचे नव्हे; तर वाहतोय ड्रेनेजचे पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील काटवन खंडोबा रोड येथील रस्त्याचे काम सप्तपदी मंगल कार्यालय येथे मागील तीन महिन्यांपासून थांबले आहे. तीन महिन्यांपासून रस्ता खणून ठेवल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर जेसीबीने रस्ता खोदताना ड्रेनेजलाईन फुटल्याने सर्व घाण पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असून, लवकरच शाळा व पावसाळा देखील सुरु होत आहे. ठप्प झालेले काम तात्काळ सुरु करण्यासाठी नागरिकांमधून मागणी होत आहे. पावसाळा सुरु झाल्यास नागरिकांना पलीकडील भागात जाण्यास रस्ता असून देखील तो रहदारीसाठी बंद होणार आहे. तसेच शालेय विद्यार्थी व महिला वर्गाला देखील या रस्त्यावरुन वाट काढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

# कुलकर्णी यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील प्रसाद शास्त्री कुलकर्णी यांना वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान (सलग्न महाराष्ट्र ज्योतिष प्रतिष्ठान) यांच्या वतीने 'ज्योतिष प्रविण कुंडली शास्त्र' या विषयात पदवी प्रदान करण्यात आली.

या गौरव समारंभात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन व सत्काराचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आचार्यगण, गुरुजन, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या यशाबद्दल सर्व मित्रपरिवार व समस्त ग्रामस्थ, निंभेरे यांच्यातर्फे प्रसादशास्त्री यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.



प्रसादशास्त्री कुलकर्णी हे ज्योतिष व याज्ञिक क्षेत्रातील गाढे अभ्यासक असून, महाराष्ट्रासह भारतात व परदेशातही त्यांना ऑनलाइन पूजा विधी करण्यासाठी निमंत्रित केले जाते.

# रेडी नदीच्या पुलाची दुरुस्ती करा: आपशोटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग, अनुक्रमांक ३० हा १६ किलोमीटरचा रस्त्यावरील देवटाकळी येथील रेडी नदीवरील पूल दरवर्षी पावसाळ्यात अनेक वेळा दोन दोन दिवस बंद असतो. अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना व रुग्णांना तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी अनेक अडचणी येतात.पूलाची दुरुस्ती व्हावी यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेषराव आपशेटे ते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव ते दहिगावने शेवगाव हद्दवरील शहरटाकळी, देवटाकळी, मठाचीवाडी, भावीनिमगाव, रांजणी, ढोरसडे या गावातील नागरिकांना रोज भातकुडगाव फाटा मार्गावरील देवटाकळी येथील रेडी नदीच्या पुलावरून तालुक्यातील शेवगाव, कुकाणे, नेवासा, अहिल्यानगर, संभाजीनगर येथे जाणे येणे करावे लागते. या मार्गावरून रोज हाजारावर लहान-मोठ्या



वाहनांचा प्रवास असतो. देवटाकळी येथील रेडी नदीवरील पूल जवळपास ५० वर्षांपूर्वी बनलेला असून त्याची उंची कमी असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असते.हा रस्ता पावसाळ्यामध्ये अनेकदा दोन दोन दिवस बंद असतो.या रस्त्यावरून शहरटाकळी परिसरातील गावांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात जाणे किंवा येण्यासाठी तर गरोदर महिला,वयोवृद्ध,तसेच गावातील लोकांना आरोग्याच्या दृष्टीने तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी आरोग्य सेवेसाठी हाच मार्ग आहे.तसेच कायगाव टोका येथील रामेश्वर मंदिरामध्ये दशक्रिया विधीसाठी जाण्यासाठी मार्ग आहे. अहिल्यानगरला जाण्यासाठी हाच एकमेव मार्ग असल्याने या मार्गावर रहदारी अधिक असल्यामुळे बऱ्याच वर्षापासून नदीवरील पुलाची उंची वाढविण्यासाठी मागणी केली जात आहे.मात्र लोकप्रतिनिधी कडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.दोन वर्षांपूर्वी याच पुलावरून पावसाच्या पाण्यामध्ये चार चाकी टेम्पो वाहून गेला होता.सुदैवाने जीवित हानी झाली नव्हती.दरवर्षी पावसाळ्यामध्ये या पुलावरून पावसाच्या पाण्याने वाहतूक बंद होत असते.तरी लोकप्रतिनिधींना या पुलाकडे दुरुस्त करण्यासाठी लक्ष घालून लवकरच या फुलाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी श्री.आपशेटे यांनी केली आहे.

> दरवर्षी विद्यार्थ्यांना पावसाळ्यात अडचणी येत आहेत.बऱ्याच वर्षापासून हा पूल व्हावा अशी जनतेची मागणी आहे.दरवर्षी पावसाळ्यात हा रस्ता दोन-दोन दिवस बंद होतो.दरवर्षी या नदीवर एखादी दुर्घटना घडतेच.त्यामुळे हा पुल होणे खूप गरजेचे आहे.
>
> **– शेषराव आपशेटे, सामाजिक कार्यकर्ते, शहरटाकळी.**

## संपादकीय

### लक्ष्य नवी ओळख निर्माण करण्याचे

भारताने 'ऑपरेशन सदूर'द्वारे केलेल्या कामगिरीची देशातच नव्हे तर जागतिक पातळीवरही मोठी चर्चा झडली. 'ऑपरेशन सदूर' थांबले नसून यापुढेही सुरू राहील, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. हे ऑपरेशन बंद करत आहोत, असे पंतप्रधानानांनी म्हटलेले नाही. उलटपक्षी, आता हा भारताच्या रणनीतीचा एक भाग असल्याचे स्पष्ट करत त्यांनी पाकिस्तानला योग्य तो संदेश दिला आहे. ही मोहीम बंद करण्याचे सूचित केले असते, तर पाकिस्तानशी भारताचे संबंध सुधारत असल्याचे निदर्शक मानले गेले असते. म्हणूनच ही कारवाई वा धोरण सुरू ठेवत भारताने दहशतवादाविरुद्ध आपली खंबीर भूमिका जगापुढे मांडली आहे. त्याचे परिणाम येत्या काळातही बघायला मिळतील. भारताच्या या नीतीमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल वा काही गोष्टींची, धोरणांची भरही येत्या काळात बघायला मिळू शकते. जसे की, दहशतवाद्यांना चोख उत्तर देण्यासाठी लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रे डागून आपण त्यांचे तळ उद्‌ध्वस्त केले. नंतर भारताच्या प्रतिनिधी मंडळाने जगभरातील देशांना भेट देत आपली या ऑपरेशनसंदर्भातील भूमिका स्पष्ट केली. या प्रतिनिधी मंडळात देशातील सर्व राजकीय पक्षातील प्रतिनिधींचा समावेश बघायला मिळाला. पाकिस्तानने भारताविरुद्ध काय केले आणि भारत काय करत आहे, हे त्यांनी सप्रमाण सांगितले. या सगळ्यातून पाकिस्तानमध्ये आश्रय घेणाऱ्या दहशतवाद्यांविरुद्ध जगभरात एक मोहीम सुरू करत असल्याची भारताची भूमिका स्पष्ट झाली आहे. जगाच्या पटलावर अशा ठोस आणि पारदर्शी भूमिकेचा चांगला प्रभाव बघायला मिळत असून अनेक देश भारताला समर्थन देताना दिसत आहेत. एव्हाना या हल्ल्यामध्ये नुकसान झाल्याबद्दल पाकिस्तानप्रती संवेदना व्यक्त करणारे निवेदनही काही देशांनी मागे घेतले आहे. पाकिस्तानची कृती चुकीची असल्याचे आम्ही घोषित करतो, असे म्हणत त्यांनी भारताला पाठबा दिला आहे. थोडक्यात, अलिकडच्या या घटनांचा भारताच्या जागतिक प्रतिमेवर चांगला प्रभाव पडताना दिसत आहे. स्वाभाविकच भारताचे अन्य देशांशी असणारे संबंध दृढ होण्याच्या दृष्टीनेही या सगळ्याची मदत होईल. भारत हा दहशतवाद्यांविरुद्ध वेगवान कारवाई करणारा पहिला देश ठरला आहे. अगदी अलिकडचा काळ लक्षात घेतला तरी रशिया आणि युक्रेन मधील तणाव तीन वर्षांनंतरही संपुष्टात आलेला नाही. उलट, युक्रेनच्या अलिकडच्या छुप्या ड्रोन हल्ल्यामुळे तो गंभीर झाला आहे. हल्ल्यामुळे इस्रायल आणि हमासमधील संघर्षही धुमसत आहे. आपण मात्र केवळ सहा दिवसांमध्ये हा संघर्ष संपवून टाकला. यावेळीही आपण दहशतवाद्यांना थारा देणाऱ्या देशातील लष्करी आस्थापनांना नव्हे तर, दहशतवादी केंद्रांना लक्ष्य केले. तेथील नागरिकांना कोणताही धक्का न पोहोचवता आपण हे ऑपरेशन यशस्वी करुन दाखवले. पाकिस्तानने आपण हे युध्द हरल्याची अधिकृत घोषणा केली नसली तरी मानसिकदृष्ट्या हा देश हरल्याचे स्पष्ट दिसत आहे. तेथील राजकारणी, पंतप्रधान, सेनाध्यक्ष, फिल्ड मार्शल, सैन्य या सगळ्यांनाच आपण जकलो नसून हरल्याची भावना सतावत आहे. तसे पाहिले तर कोणताच देश आपण युद्ध हरलो, असे कबुल करत नाही. परंतु, पाकिस्तानातील सध्याचे वातावरण आणि तेथील लोकांची वक्तव्ये पराभव मान्य केल्याचे सूचित करणारी आहेत.

आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे मागील काही दिवसांमध्ये बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधी मोहीम तीव्र झाली आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)ने घोषणा करत सुराब या शहरावर पूर्ण नियंत्रण मिळवल्याचे स्पष्ट केले आहे. आता हे शहर आपल्या ताब्यात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ही बाबदेखील नोंद घेण्याजोगी ठरेल. म्हणजेच एकीकडे पाकिस्तानच्या अडचणी वाढणे तर दुसरीकडे भारताप्रतीचा विश्वास बलाढ्य होऊन आपल्या रॉकेट प्रणाली वा संरक्षक शस्त्रांना जगभरातून मागणी वाढणे हे भारताची ताकद वाढत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल. हे वास्तव भारताची जबाबदार भूमिका स्पष्ट करण्यास पुरेसे म्हणावे लागेल. 'ऑपरेशन सदूर' सुरूच राहण्याचा परिणाम येत्या काळातही नक्कीच बघायला मिळेल. भारताच्या या कठोर पावलामुळे दहशतवादी कारवाया कमी होण्यास मदत होणार आहे. या जोरदार तडाख्यामुळे दहशतवादी गट मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या हरले आहेत. त्यांची ताकद कमी झाली आहे. म्हणूनच भारताविरुद्ध कोणतीही दहशतवादी कारवाई करण्यापूर्वी त्यांना आता दहा वेळा विचार करावा लागेल. खेरीज आता काश्मीरमध्ये पर्यटकांनी येण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री आवाहन करताना दिसत आहेत. पर्यटकांनी आनंदाने यावे, काश्मीर त्यांचे रक्षण करण्यास समर्थ असल्याचे त्यांचे प्रतिपादन पर्यटकांमध्ये विश्वास निर्माण करत असून त्याला चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. जम्मू आणि काश्मीरमधील राजकारण्यांची ताजी भूमिकाही चर्चेचा विषय ठरत आहे. पहलगाममध्ये हल्ला झालेल्या ठिकाणी मृत पर्यटकांचे स्मारक उभारण्याचे जाहीर करुन श्रद्धांजली वाहण्याचा निर्णयही महत्त्वपूर्ण म्हणावा लागेल. यातून सरकार जागरुक आणि संवेदनशील असल्याचा संदेश समाजापर्यंत जाईल. स्वाभाविकच याची दखल घेतली जाईल. मात्र आता सरकारबरोबरच नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. कोणीही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेऊ नये; केवळ भारताच्या भूमिकेवर विश्वास ठेवायला हवा. या सगळ्यामध्ये पाकिस्तानला मदत करणाऱ्या, त्यांच्या कृतीचे समर्थन करणाऱ्या तुर्की वा अजरबैजान या देशांविरुद्ध भारताने ठाम भूमिका घेतली आहे. आपण त्यांच्यावर विश्वास ठेवणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांच्या भूमिकेचा जाहीर निषेधही भारताने नोंदवला आहे. तुर्कीने पाकिस्तानला मदत केल्याचे परिणाम लवकरच भोगावे लागणार असून व्यापार, व्यवसाय, नागरिकांचे येणे-जाणे या सगळ्यांवरील निर्बंधाच्या रुपाने ते पहायला मिळतील. तुर्कीमधील काही कंपन्या भारतात काम करतात.फ्द् आता भारत त्या बंद करत असल्यामुळे त्यांना मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. खेरीज रशिया आणि पाकिस्तानमध्ये तंत्रज्ञान देण्याविषयक करार झाला असला तरी हा देश त्यांना शस्त्र विकणार नाही. रशियाला पाकिस्तानपेक्षा भारताची जास्त गरज आहे. हे सगळे लक्षात घेता भारताची दहशतवादाविरुद्धची लढाई योग्य दिशेने सुरू असून त्याला जगाचा पाठबा असल्याचे लक्षात घ्यायला हवे.

# आला पाऊस झोकात...



**प्रासंगिक**
**– उर्मिला राजोपाध्ये**

अलिकडचे देशात आणि जगात अनेक घडामोडी घडून गेल्या. त्याचे साद-प्रतिसाद पाहायला मिळाले. त्याचा आपल्या वैयक्तिक आयुष्यावरही थोडाफार परिणाम झाला. मात्र या सगळ्यातून आलेली अस्वस्थता दूर करणारा काळ लवकरच सुरू होत आहे. पाऊस जोरात बरसत असून चांगला पाऊसकाळ जवळ आल्याचे संकेत देत आहे. ज्येष्ठ मासही सुरू झालाय. आता सगळे अमंगल वाहून जाईल अशी अपेक्षा करु या.

यंदा उन्हाने चांगलेच भाजून काढले बाबा... जवळपास दर वर्षी अनेकांकडून कानी पडणारे हे वाक्य आताही अनेकदा ऐकायला मिळाले. उन्हाच्या काहिलीत सृष्टी होरपळली. काही भाग भीषण पाणीटंचाईने कोरडा पडला. मात्र मान्सून वेळेवर आला. तो ज्या पध्दतीने बरसतोय ते पाहता यंदा सरासरीपेक्षा थोडा जास्तच बरसणार, ही आनंदवार्ता या त्रासावर समाधानाची हलकीशी सर बरसवून गेली आहे. आता बहाव्याच्या सड्यांनी हळदरंगात माखलेले, पळसफुलांनी सजलेले, गुलमोहराने तांबडे झालेले रस्ते धुळमाखले होतील आणि बरसत्या धारांमध्ये इतके मनसोक्त न्हातील की अवघा रंग एक होऊन गेल्यासारखे वाटेल. मग सगळीकडे नवोन्मेषाची, सर्जनाची, नवतेची, आरंभाची निळाई दिसू लागेल. जीवनाचा, जगण्याचा नवा रसरशित अध्याय सुरू होईल. हा काळ समोर उभा आहे. प्रत्येक ऋतूची, वातावरणीय बदलाची एक ओळख असते. संस्कृतीत, दिनक्रमात, भावभावनांच्या झुल्यावर त्याचे वेगळे महत्त्व असते. हे बदल वर्तमानातले असतात, पण ते आपल्याला भूतकाळात कधी घेऊन जातात हे समजतही नाही. म्हणूनच एका अर्थी ऋतूबदलाचा धागा थेट गतकाळाशी जोडणारा असतो. कदाचित म्हणूनच तो अधिक रम्य आणि मनोहर असतो. पाऊस ही तर यातील महत्त्वाची कडी. पाऊस कधीच एकटा येत नाही. तो बालपणापासून अगदी आदल्या वर्षापर्यंतच्या आठवणींची अनेक गाठोडी घेऊन येतो. अर्थात सगळ्याच आठवणी रम्य असतात असे नाही. काही चटके देणाऱ्या, विव्हल करणाऱ्याही असतात. पण त्यावर फुंकर घालणारा पावसाचा नाद वेडावून टाकतो यात शंका नाही.

बाहेर बरसणाऱ्या जलधारा पहाताना एखाद्या घरातून 'ए आई, मला पावसात जाऊ दे' अशी आर्जवे ऐकू येऊ लागतात. काही घरांमधून आले घातलेल्या वाफाळत्या चहाची, कांदा भजीही मागणी होऊ लागते. भजी आणि चहाचा दरवळ अवघ्या वातावरणात भरून राहतो. या निमित्ताने कुटुंब एकत्र येते. मस्त गप्पा होतात. पावसाच्या सानिध्यात मन मोकळे होते. गोड गळ्याचे देणे लाभलेली एखादी गृहिणी आपल्या लडिवाळ स्वरातून पावसाचे स्वागत करते. पावसाळा येणार म्हटल्यावर लगबग आधीच सुरू झालेली असते. पावसाळ्याची तयारी म्हणून छपराची नव्याने शाकारणी झालेली असते. ग्रामीण भागात घरच्या लेकी-सुनांची जळण, गोवऱ्या गोळा करण्याची लगबग सुरू असते. पावसाळ्याच्या तोंडावर प्राणी आणि पक्षीही साठवणी, शाकारणीच्या तयारीत असतात. पावसाळा जवळ येऊ लागला की मुंग्यांची रांग तोंडात खाद्य घेऊन जाताना दिसते. प्रत्येकीच्या तोंडात अन्नाचा कण असतो. पावसाळा हा विणीचा काळ असल्याने पक्षीही घरटे विणायच्या तयारीत असतात. कुठून येत असेल ही प्रेरणा, इतके ज्ञान... पक्ष्याचा जीव तो केवढा, पण सर्जनशील ऋतूच्या चाहुलीने त्यांनाही नव्हाळीचे वेध लागतात.

पावसाळ्यातला आनंद असाच असतो. उन्हात तापलेली, तहानलेली ढेकळे पहिल्या पावसात गटागट पाणी पिऊन तृप्त होतात. स्वत:चे अस्तित्व विसरून पावसाच्या स्वरूपाशी एकरूप होण्याचा संदेशच जणू ती देत असतात. पावसाळ्याला सुरूवात झाली की आसमंतात चैतन्य भरून राहते. कण न कण धुवून निघाल्यामुळे चल-अचल वस्तूंचा मूळ रंग समोर येतो. त्यामुळे एखाद्या निष्णात चित्रकाराने कॅनव्हासवर एकाच वेळी विविध रंगांची उधळण केली आहे की काय, असे वाटते. एकीकडे निसर्गाचा हा रंगोत्सव सुरू असताना मानवी जीवनातही कमालीचे बदल होतात. ज्येष्ठ सुरू झाला की सवाष्णींना वटपौर्णिमेचे वेध लागतात. हदू पंचांगानुसार ज्येष्ठ महिना म्हणजे ग्रीष्म ऋतूचा शेवटचा टप्पा. मे महिन्यामध्ये सूर्य प्रखर असतो. मात्र या उन्हाच्या तापट दिवसांमध्येच श्रद्धेचा ओलावा देणारा, भक्तीचा गंध वाहणारा हा पवित्र महिना अवतरतो आणि भावविश्वही बदलून जाते.

तापलेल्या मना, सृष्टीला शांती हवी,
त्यासाठीच या महिन्यात देवाची प्रीती हवी...

ती मिळवून देण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठाचे जनांकडून स्वागत होते. हा महिना केवळ ऋतूपरिवर्तनाचा संकेतच देत नाही तर आध्यात्मिक शुद्धतेची संधीही देतो. या महिन्यात दान, स्नान, जप, तप आणि व्रतांचे विशेष महत्त्व आहे. पावसाळ्याची चाहूल लागण्याआधीच मनात आणि शरीरात साचलेली उष्णता शांत करण्यासाठी गंगा स्नान, तुलसी पूजन आणि सूर्य अर्घ्यदान यांचा धार्मिक पातळीवर आग्रह धरला जातो. हा नदीस्नानाचा महिना. या मासामध्ये विशेषतः गंगा, गोदावरी आणि नर्मदा या नद्यांमध्ये स्नान केल्यास पापमुक्ती आणि पुण्यलाभ होतो, असे शास्त्रात सांगितले आहे. गंगेच यमुने चैव, गोदावरी सरस्वति... या मंत्रांचा जप करत भक्त नदीत डुबकी घेतात. या महिन्यात साजरी होणारी वटपौर्णिमा म्हणजे पतीच्या दीर्घायुष्यासाठी पत्नीने केलेले व्रत असते. वटवृक्षाच्या पूजनाने, सत्यवान-सावित्रीच्या पवित्र कथा ऐकून स्त्रिया उपवास करतात. वटवृक्ष सावित्रीच्या प्रेमाचा साक्षीदार आहे. या दिवशी त्याची पूजा करुन त्याप्रती आदरभाव व्यक्त केला जातो. ज्येष्ठामध्ये निर्जला एकादशीचे खास महत्त्व आहे. या दिवशी पाणीही न घेता उपवास केला जातो. याला 'भीम एकादशी' असेही म्हणतात. या दिवशी व्रत केल्यामुळे वर्षभरातील सर्व एकादशीचे पुण्य एकाच दिवशी मिळते, असा भाविकांचा समज आहे. गंगा दशहरा हा दिवस गंगेच्या पृथ्वीवर अवतरणाचा दिवस मानला जातो. यानिमित्ताने ज्येष्ठातील या तिथीला गंगेच्या तीरावर विविध पूजाअर्चा केल्या जातात. भाविक गंगेमध्ये पवित्र स्नान करुन अर्घ्य देतात आणि तीर्थदान करतात.

थोडक्यात, ज्येष्ठ महिना म्हणजे देह आणि मन शुद्ध करण्याचा काळ आहे, असे म्हणता येईल. उन्हाच्या दाहातून बाहेर पडण्यासाठी केवळ पाणी पुरेसे नसते तर ध्यान, भक्ती आणि सेवा या माध्यमातून आपले मनही थंडावले पाहिजे हाच संदेश ही व्रतवैकल्ये देतात.

घामेने अंग जळते तरी ओंजळीत पाणी थांबते,
भक्तीने मन शांत होते जेव्हा श्रीराम नाम स्मरते... असे म्हणतात ते उगाच नाही.

एकंदरच हा काळ म्हणजे सृष्टीतल्या सर्व जीवांना नवसंजीवनी देणारा कालखंड. हा महिना आपल्याला सहनशीलतेचा तसेच भक्ती आणि ऋतूंशी सुसंवादाचा धडा देतो. या महिन्यातील सण केवळ परंपरा नाहीत तर आपल्या मनोबलाचा आणि धार्मिक आस्थेचा आरसा आहेत. त्यामुळेच या महिन्यात केवळ उन्हाचे चटके लक्षात ठेवणे योग्य नाही तर त्यात दडलेली अध्यात्माची गोडी, प्रेमाची आस्था आणि भक्तीची उब अनुभवणे, त्याचा आनंद घेणे गरजेचे आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

एकीकडे असे सगळे सुरू असताना पावसाळ्याची सुरुवात म्हणजे शाळा, कॉलेजचीही सुरुवात. जूनचा पहिला आठवडा शालेय साहित्याची खरेदी करण्यात जातो तर दुसरा आठवडा नवी कोरी पुस्तके पावसात भिजू नयेत या काळजीने धडपडण्यात जातो. आता लवकरच मुले सवंगड्यांसमवेत भिजत घरी येण्याच्या आनंद मनमुराद लुटणार आहेत. एखाद्या दिवशी भरपूर पाऊस पडल्यानंतर शाळेला दांडी मारण्याची संधी मिळाली कवा शाळा बंद असल्याचा फोन आला की त्यांच्या मुखावर दिसणारा आनंद लवकरच बघायला मिळणार आहे. खिडकीत बसूनही पावसाचा मनमुराद आनंद देणारा काळ आता हाकेच्या अंतरावर आहे.

तसे बघायला गेले तर आयुष्याच्या प्रत्येक कालखंडातला पाऊस वेगळा भासतो. लहानपणी गरजणारा पाऊस धीरगंभीर वाटतो पण कॉलेजमध्ये गेल्यावर तोच हट्टी जोडीदार होतो. तयार होऊन बाहेर पडताना अचानक येऊन भिजवण्याचा शिरस्ता तो कधीच मोडत नाही. पण त्यावेळी त्याचा रागही येत नाही उलट, कौतुकच वाटते. कुंद हवेत वाफाळती कॉफी पिताना त्याची सोबत हवीहवीशी वाटायची. पावसाचा एखादा शिडकावाही सुखावून जातो. वय पुढे सरकते, मात्र पाऊस त्याच नादात बरसत राहतो. त्याचे प्रत्येक रुप मनोहर, लोभसवाणे असते. आताही आपण त्याचा अनुभव घेत आहोत. यंदा या सुहृदाची, सोयऱ्याची प्रेमळ साथ मिळो आणि संपूर्ण पाऊसकाळ निर्विघ्न पार पडो, हीच आशा मनी धरुन स्वागताला सज्ज होऊ या.

# मराठा समाजाने हुंडा बंद करण्याचा उचलला विडा

## लग्नातील 'बडे जाव पणा' संपविणारी आचारसंहिता जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पुण्यात वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर शाही विवाह सोहळे, हुंडा, मानपान, लग्नातले दिखावे, याचीही चर्चा सुरू झाली. यावर अहिल्यानगर मधील मराठा समाजाने अत्यंत पुरोगामी पाऊल उचलत समाजातून हुंडा हद्दपार करण्याचा विडा उचलला आहे.

लग्नातील बडे जाव पणा संपविणारी आचारसंहिताच जाहीर केली आहे. पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्येनंतर खडबडून जागा झालेल्या मराठा समाजातल्या विचारवंतांनी अहिल्यानगरमध्ये एक बैठक घेत अतिशय महत्त्वपूर्ण आणि पुरोगामी पाऊल उचललं. लग्न साध्या पद्धतीने करा, हुंडा प्रथा बंद करा, प्रीवेडींग शूट बंद करा असे काही नियम या आचारसंहितेत घालून देण्यात आले आहेत.



आचारसंहितेचं पालन करणाऱ्या पालकांचा समाजातर्फे जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. तसंच आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समितीही स्थापन करण्यात आली आहे.

मराठा समाजाच्या लग्न समारंभासाठी आचारसंहितेमध्ये लग्न सोहळा हा १०० ते २०० मर्यादित लोकात केला जावा. प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये. कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे, लग्नात डीजे नको.पारंपरिक वाद्य, लोक कलावंतांना संधी द्या, कर्ज काढून लग्नात खर्च करू नये. मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत. नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. हार घालताना नवरा नवरीला उचलू नका. लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे आणि इतर सत्कार बंद करावेत, लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.

### ... ही खरोखर स्वागतार्ह बाब


विशेष म्हणजे असेच नियम याआधी आगरी समाजानेही तयार केले आहेत. कोकणातही सर्व समाजांच्या लग्नात कित्येक पिढ्या हुंडा, देणीघेणी, मानपान होत नाहीत. तसंच लग्नाचा खर्चही अर्धा अर्धा केला जातो. आता मराठा समाजानेही आचारसंहिता निर्माण करून फुकटच्या बडेजावाला पायबंद घातलाय, ही खरोखर स्वागतार्ह बाब आहे.

# 'वाचन आवड'च्या अध्यक्षपदी महादेव कौसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : वाचन आवड सांस्कृतिक मंच पाथर्डीच्या अध्यक्षपदी महादेव कौसे यांची तर संदीप काळे यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. वाचन आवड सांस्कृतिक मंचचे मुख्य समन्वयक तथा संस्थापक आदर्श शिक्षक भाऊसाहेब गोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची सहविचार सभा पार पडली.

मराठी भाषा प्रचार व प्रसार तसेच भाषा संवर्धन करण्यासाठी काम करणारे वाचन प्रेमी या वेळी उपस्थित होते. मराठी भाषेतील साहित्य मनाला आनंद देणारे आहेत. वाचन प्रेमी नागरिकांना वाचनाची गोडी लावली जाते तसेच थोर विचारवंत, साहित्यिक, कवी, लेखक यांच्या साहित्यकृती बद्दल नागरिकांना माहिती दिली जाते. २०१४ साली स्थापन



झालेल्या वाचन आवड सांस्कृतिक मंचचे कार्याबद्दल आतापर्यंतच्या कार्याचा आढावा सुनिल कटारिया यांनी घेतला.

नूतन अध्यक्ष कौसे म्हणाले की, नवीन पिढी वाचनापासून दुरावत चालली आहे. त्यांना वाचनाची गोडी लावून, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून, भाषा संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील. विविध क्षेत्रातील नावाजलेल्या कलाकृतीबद्दल वाचकांना माहिती दिली जाईल. त्याबद्दल विचारमंथन होईल. वाचन चळवळ आणखी सर्व सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी नवीन कार्यकारिणी यांनी पुढाकार घेऊन प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा मुख्य समन्वयक भाऊसाहेब गोरे यांनी व्यक्त केली.

यावेळी जाहीर करण्यात आलेली कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष महादेव कौसे, सचिव संदीप काळे, कार्याध्यक्ष रामनाथ शेळके, उपाध्यक्ष विठ्ठल देशमुख, विकास पावले, मुख्य संघटक शिवाजी बडे, प्रसिद्धी प्रमुख अमोल कांकरिया, बाबासाहेब गर्जे, सदस्य सुनील काटारिया, प्रताप देशमुख, चंद्रकांत उदागे, अशोक वामन, विक्रम घुले, प्रदीप साळवे, हर्षल धायतडक, सचिन नागपुरे, सुरेश बोरूडे, सल्लागार प्राचार्य डॉ. गौतम ढेणे, संजय ससाणे, मुख्य समन्वयक बाबासाहेब गोर आदींची निवड झाली आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### 'क्लिन प्लांट'अंतर्गत तीन केंद्र उभारणार

विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीचा उत्पादन खर्च वाढतो आहे आणि त्यासोबत शेतीसाठी आवश्यक पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत उन्नत तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्वाचे आहे. हॅकॅथॉनमध्ये मांडलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. जलसिंचन, पीक काढणी, पिकांवर फवारणीचे तंत्रज्ञान, एआय कंन्ट्रोल रोव्हर्स, कीड व्यवस्थापनात मशिन लर्निंगचा उपयोग, शेल्फ लाईफ वाढविणारे ड्रायर्स, शेतमालाचे प्राण्यांपासून संरक्षण, काढणी पश्चात प्रक्रियेचे तंत्रज्ञान आदी उत्कृष्ट प्रकारचे तंत्रज्ञान इथे मांडण्यात आले आहे. हे उपाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे उत्तम उत्पादनात रुपांतर करून ते बाजारापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे कार्य शेती क्षेत्राने केले. त्यामुळे या क्षेत्राला बळ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

### सच्चा नेता हा परिवर्तनचा शिलेदार : सौ. विखे

त्यांच्या व्यक्तिमत्वाला शोभेल असेच आहे. त्यांनी केलेल्या संघर्षात खूप काही दडलेल आहे. आजोबांकडून मिळालेला विचारांचा आणि संघर्षाचा वारसा त्यांनी पुढे नेण्याचे काम त्यांच्याकडून सुरू असल्यानेच प्रश्नाची मांडणी संतोष रोहोम करू शकतात. यामागे त्यांच्या दृष्टीकोन होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात लढा देवून समाजातील लोकांना न्याय मिळवून देणार असल्याचे सौ. विखे म्हणाल्या. जेष्ठ नेते दशरथ सावंत यांनी आपल्या भाषणात परीवर्तानाच्या काळातील एक सच्चा नेता म्हणून संतोष रोहोम यांची नोंद झाली आहे. भगतसिंगासारखे धाडस त्यांनी दाखवले. डॉ. आंबेडकर यांचे विचार फक्त नावासाठी विचार जपणारे अनेक जण आहेत. मात्र रोहोम यांनी त्या विचारावर वाटचाल करून राजकाराणात सकारात्मक पर्याय उभे करण्यासाठी केलेले प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. आपल्या सत्काराला उत्तर देताना संतोष रोहोम म्हणाले की, कोव्हीड संकटात आलेल्या अंधत्वावर मात करण्यासाठी अनेक मित्रांनी आधार दिला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या सहकार्यामुळे आज मी आपल्यात आहे. तालुक्यातील अनेक प्रश्नांसाठी संघर्ष केला. यातून तयार झालेल्या वातावरणातून परीवर्तन झाले. अन् आमचा चाळीस वर्षाचा वनवास संपला असल्याचे त्यांनी सांगितले.

### संशोधकांची रिक्त पदे भरा

शांतता दिली. अनेक चांगले प्रकल्प (सर्व क्षेत्रातील) या विद्यापीठात राबवले गेले. सद्यस्थितीत विद्यापीठातील संशोधन, विस्तार, शिक्षण या कार्यक्रमात शिथीलता आलेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सेवा निवृत्तीमुळे किंवा काही इतर कारणांमुळे अनेक मंजूर पदे रिक्त आहेत. ३१ मे अखेर प्राध्यापकांची, शास्त्रज्ञांची ५७ टक्के पदे रिक्त आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत हा आकडा ६६ टक्के पर्यंत जाणार आहे. एका माणसांकडे ३ कामांचा पदभार आहे. याचा विपरीत परिणाम संशोधनावर होत आहे. एक संशोधन प्रकल्प यशस्विरित्या कार्यान्वीत होण्यासाठी सुमारे ६ ते ७ वर्षांचा कालावधी लागतो. अशीच परिस्थिती राहिल्यास पुढील सहा वर्षांत कोणतेच नविन संशोधन अस्तित्वात येणार नाही. कृपया उक्त सर्व बाबींचा प्राधान्याने विचार होऊन चारही विद्यापीठातील संशोधक, संशोधक सहाय्यक व इतर तत्सम रिक्त पदांवर नियुक्त्या करण्यात याव्यात, अशी मागणी माजी खा. तनपुरे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केली आहे.

### 'संजीवनी'कडून चमकणारे तारे घडविण्याचे कार्य

मिळावे, हे स्वप्न माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी पाहिले आणि त्यांच्या परिपुर्तीसाठी संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी काळाच्या वेगाने पावले टाकत अचूकपणाने यातील संधी शोधल्या, जागतिक स्तरावरील नासा, इस्रो, टाटा, जीओ रिलायन्स यांसह देश -विदेशातील महत्वाच्या पदावर संजीवनीचा विद्यार्थी काम करतो आहे. याचा आम्हास अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच गुणात्मक शिक्षणाला प्राधान्य द्यावे. माजी आमदार कोल्हे म्हणाल्या की, पालकांनी कष्ट घेवून आपल्या पाल्यांना शिकविले. दहावी-बारावीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम संपन्न होत आहे. उच्च शिक्षण घेताना मुला-मुलींनी योग्य अभ्यासकम व शिक्षणसंस्था निवडुन वाटचाल करावी. आयुष्यात उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रत्येकाला तडजोड करावीच लागते. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी खेड्यापाड्यातील ग्रामिण भागातून मातीशी नाळ जोडलेल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने संजीवनीचे वैभव उभे केले आहे. याप्रसंगी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे डॉ. एम. व्ही. नागरहल्ली, के. बी. पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य ए. आर. मिरीकर, डॉ. समाधान दहिकर आदि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार व सुत्रसंचलन प्रा. साहेबराव दवंगे यांनी केले.

### स्व. मुंडेंचे विचार सदैव सोबत : ना. पंकजा मुंडे

जर त्यांना रक्त लागले असते तर आपण कमी पडू दिले असते का? असा भावनिक प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या कार्यक्रमामधून आम्ही गोपीनाथ मुंडे यांना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतो, असेही त्या पुढे म्हणाल्या. पंकजा मुंडे म्हणाल्या, ईश्वराला देखील मागावे लागते, तो मागितल्याशिवाय देत नाही. आपण देखील मागण्यासारखे असावे लागते. गोपीनाथ मुंडे यांचे विचार त्यांचे संस्कार आपल्या सोबत आहेत.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ऊस उत्पादन वाढणार

## सुरेश माने; थोरात कारखान्याच्या वतीने ऊस वाढ विकास मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम शेतकरी सभासद उत्पादक यांचे हित जोपासले आहे.

कारखान्याने सातत्याने विविध योजना राबविल्या असून एकरी उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा व शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यास प्रत्येक शेतकऱ्याला नक्की लाभ होईल, असा विश्वास ऊस तज्ञ सुरेश माने यांनी व्यक्त केला आहे. याचबरोबर हुमणी भुंगेरे यांचा प्रादुर्भाव जून महिन्यात कमी करता येईल असे त्यांनी सांगितले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने निमगाव बुद्रुक, धांदरफळ, पेमगिरी येथे आयोजित ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर अ‍ॅड. माधवराव कानवडे, व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले, संचालक विनोद हासे, नवनाथ आरगडे, रावसाहेब दुबे, रोहिदास पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे, बाळासाहेब सोनवणे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरेश माने म्हणाले की, उसाचे जास्त उत्पादन काढण्यासाठी जास्त पाणी न वापरता ठिबक सिंचनचा वापर केला आणि सेंद्रिय द्रवाबरोबर उसामधील अंतर हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व शेतकरी जूनम ध्ये लागवड करतात आणि मग ऊस तोडीसाठी एकाच वेळी सर्व ऊस येतो म्हणून टप्प्या-टप्प्याने ऊस लागवड केल्यास ऊसतोडणी सुद्धा त्या पद्धतीने येईल.

### यांनीही व्यक्त केली मनोगते

माधवराव कानवडे म्हणाले की, ऊस आणि दूध हे शाश्वत पीक आहे. शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने ऊस पिक घेण्याऐवजी त्यामध्ये अत्याधुनिक पद्धतींचा वापर केला पाहिजे. तर पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, ऊस वाढव विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी कारखान्याच्या वतीने विविध योजनांचे आयोजन करण्यात आले असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांना पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील अकोळनेर, सारोळा, कासार, वाळकी, शिराढोण, खडकी, खंडाळा या परिसरामध्ये ढगफुटी सदृश पावसाचा हाहाकार झाला होता. अशा संकट कालीन परिस्थितीमध्ये नगर तालुक्याचे सहा. पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जीवाची पर्वा न करता स्वतः पाण्यात उतरून नागरिकांचे प्राण वाचवले. प्रल्हाद गिते याच्या धाडसी कार्यामुळे पोलीसांची प्रतिमा जनसामान्य लोकांमध्ये नक्कीच उंचावेल असे प्रतिपादन सचिनभाऊ जगताप यांनी व्यक्त केले. नगर तालुक्याचे सहा. पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांना आ.संग्रामभैय्या जगताप सोशल फाउंडेशनचा शौर्य पुरस्कार प्रदान करताना. गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिनभाऊ जगताप यावेळी माणिकराव विधाते, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, वैभव ढाकणे, गोरख दळवी आदी मान्यवर उपस्थितीत होते.



# वनमजुर सुभाष धनवे वेतनापासून वंचित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील डोणगाव येथील वनमजूर सुभाष धनवे व त्यांच्या पत्नी वेतनापासून वंचित आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष घालून वेतन देण्याची मागणी केली आहे. अन्यथा उपोषणाचा इशाराही त्यांनी दिला आहे. जामखेड तालुक्यातील डोणगाव येथे शासनाची वन विभागाच्या अधिकाराने गेल्या सात ते आठ वर्षांपासून रोपवाटीका चालु आहे. सदर रोप वाटिकेमध्ये डोणगाव येथील गरीब दलीत कुटुंबातील सुभाष धनवे व त्यांच्या पत्नी उषा धनवे रोपवाटीका चालु झाल्यापासून आजतागायत कार्यरत आहेत. पोटच्या लेकराप्रमाणे रोपांची काळजी घेऊन रोपवाटीका सांभाळत आहेत. याच रोपवाटीकेतुन अनेक ठिकाणी रोपे पुरवली जात असून वृक्षारोपन वाढीस मदत झाली आहे. मात्र या कष्टकरी वन मजुराकडे संबंधीत अधिकारी जाणुन बुजुन दुर्लक्ष करत असल्याचे उभय पती- पत्नीच्या वतीने सांगण्यात येत आहे.



गेल्या सात वर्षापासून इतर ठिकाणच्या कोणत्याच वनमजुरांचे पगार राहिलेले नसताना या धनवे कुटुंबियाचाच पगार का केला जात नाही? असा सवाल उत्पन्न होत आहे. वरील दोन्ही पती-पत्नी म्हणजेच सुभाष यमाजी धनवे व उषा सुभाष धनवे यांचे गेल्या सहा महिन्यांचे पगार का थकले हाच खरा प्रश्न असून कर्जत जामखेड विभागाचे मुख्य वन अधिकारी यांनी जाणूनबुजून पगार केलेले नाहीत. असे पती पत्नीच्या माध्यमातुन सांगितले जात आहे.

# गैरकारभार प्रकरणी जोर्वे ग्रामस्थ आक्रमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : जोर्वे ग्रामपंचायत मधील मासिक सभा व ग्रामसभा यांतील अनियमितता व एप्रिल २०२२ ते मार्च २०२५ मधील १५ व्या वित्त आयोगातून विविध कामांमध्ये वस्तू खरेदीत झालेल्या गैरकारभार या विरोधात जोर्वे गावातील ग्रामस्थांनी पंचायत समिती तक्रार दाखल केली आहे. तसेच याबाबतची निवेदनही देण्यात आले आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना हे निवेदन देण्यात आले.



यावेळी बादशाह बोरकर (उपसरपंच), सदस्य दिगंबर इंगळे, किसन खैरे, हौशिराम दिघे, संदीप काकड, संगीता थोरात, सुनीता दिघे, पूनम खैरे, मंगल काकड, हौशीराम दिघे, जगन्नाथ दिघे, मुकेश काकड, बाबासाहेब बोरकर, सोपान कांदळकर, संजय थोरात, शेख हमीद, वसंत बोरकर, संतोष जाधव, कैलास इंगळे, बोरकर, सुनील थोरात, भाऊसाहेब दिघे, राहुल बोरकर, सुनील दिघे, भाऊराव बोरकर, विठ्ठल काकड, दत्तात्रय काकड, रावसाहेब काकड, संपत थोरात, बलसाने राजेंद्र, अमित थोरात आदि मान्यवर उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, जोर्वे ग्रामपंचायतीचे गैरकारभार तक्रार 'आपले सरकार' पोर्टलवर १४ एप्रिल २०२५ रोजी केली असता ग्राम विकास अधिकारी यांनी उत्तरादाखल सर्व माहिती जोर्वे ग्रामपंचायत मध्ये अर्जदार यांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे हा खुलासा करण्यात केला. मात्र प्रत्यक्षात विचारणा केली असता कार्यालयीन काम काज जास्त असल्याने दि. ३१ मे २०२५ नंतर माहीती उपलब्ध दिली जाईल, असे कळविण्यात आले.

आपणांस सातत्याने दिलेल्या अर्जाचा दोन महिन्यांपेक्षा अधिकचा कालावधी होऊनही आपणाकडूनही कोणत्याही प्रकारची चौकशी केली जात नाही. ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत सदस्यांनाही विचारलेल्या कामांची माहिती लेखी व तोंडी मागणी करूनही दिली गेली नाही. दि. ३० मे २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत विचारलेल्या प्रश्नांना दिशाभुल करणारी व चुकीची माहिती देवुन ग्रामसभेची दिशाभुल केली. अनेक प्रश्नांची उत्तरे ग्रामसभेत मिळालं नाही. तसेच सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा गैरवापर केला असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# गुंजाळवाडीच्या सरपंचांवर कारवाईची मागणी

## महिलांचा सन्मान न करता केले अहिल्यादेवींचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त शासनाच्या निर्देशांनुसार गुंजाळवाडी गावात उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान न करता त्यांचा अवमान करत केवळ औपचारि कता म्हणूनच राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे प्रतिमा पूजन करून घेत कार्यक्रम उरकला, असल्याचा गंभीर आरोप गुंजाळवाडी येथील म हायुतीच्या कार्यकर्त्यांनी सरपंचांवर करत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी गटविकास अधिकार्याकडे केली. संगमनेर तालुक्यातील



गुंजाळवाडी ग्रामपंचायतमध्ये सरपंच अमोल उर्फ नरेंद्र गुंजाळ यांनी ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित नसताना गावातील काही ज्येष्ठ नागरिक यांचा उपस्थितीमध्ये राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे पूजन केले. ही बाब महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आली. त्यानंतर त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जाऊन सरपंच अमोल गुंजाळ यांना जाब विचारला. त्यावेळी महायुती कार्यकर्ते आणि सरपंचांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर संतप्त झालेल्या महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर यांची भेट घेऊन सरपंचांविरोधात तक्रार केली. सरपंचांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केले असून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी संतप्त मागणी भाजपचे रोहिदास गुंजाळ, महेश जगताप, सुयोग गुंजाळ, अतुल गुंजाळ, गोकुळ गुंजाळ आदी कार्यकर्त्यांनी केली. नेमकी याप्रकरणी पंचायत समिती प्रशासन गुंजाळवाडी ग्राम पंचायत सरपंचावर काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर जयंतीच्या निमित्त उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन महिलांचा सन्मान करण्यासाठी समिती तयार करून ग्रामपंचायतच्या वतीने दोन महिलांचा सन्मान करण्याचे परिपत्रक शासन स्तरावरून काढण्यात आले होते. मात्र गुंजाळवाडी ग्रामपंचातीचे सरपंचानी कुठली समिती स्थापन केली नाही. तसेच त्या दोन महिलांचा सन्मान केला नाही ही अत्यंत संताप जनक बाब आहे.
**रोहिदास गुंजाळ, माजी तंटामुक्ती अध्यक्ष गुंजाळवाडी.**

# मोबाईल व्हॅनमुळे कर्करोगाचे निदान होणार

## उपायुक्त मुंडे; कॅन्सर स्क्रिनींग सेवेचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाच्या माध्यमातून कर्करोग निदान व्हॅन सेवा आपल्या शहरात सुरू झाली आहे. अहिल्यानगर शहराच्या महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेतील हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून लवकर निदान होईल व उपचाराची संधी वाढतील. अनेकवेळा कर्करोगाचे निदान अखेरच्या टप्प्यात होते. त्यामुळे उपचाराला संधी मिळत नाही. या या मोबाईल व्हॅनमुळे वेळेत निदान होईल व नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा महानगर पालिकेमार्फत उपलब्ध होईल, असा विश्वास उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासन संचलित कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन मार्फत कॅन्सर स्क्रिनींग सेवेचा शुभारंभ मंगळवारी कै. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या यांच्या हस्ते करण्यात आला. महानगरपालिकेच्या जिजामाता आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे झालेल्या या कार्यक्रमास उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, माजी नगरसेवक मीना चोपडा, प्रकाश भागानगरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतिश राजुरकर, प्रभाग अधिकारी शहाजान तडवी आदी उपस्थित होते.

उपायुक्त डॉ. मुंडे म्हणाले की, नागरिकांना अधिकाधिक चांगल्या आरोग्य सेवा व सुविधा देण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून उपक्रम राबवले जात आहेत. कॅन्सर स्क्रिनींग मोबाईल व्हॅन हा त्याचाच भाग आहे. नागरिकांनी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या या सेवांचा लाभ घ्यावा, इतर आरोग्य विषयक योजनांचाही लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# सैदापूर ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार?

## अमोल केदार यांची चौकशीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : सैदापुर (ता. पाथर्डी) येथील ग्रामपंचायतीत २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांतील विविध शासकीय योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थ अमोल राजेंद्र केदार यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून त्यांनी या कामांची चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात त्यांनी स्पष्ट केले आहे की, १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून संगणक व प्रिंटरसारख्या वस्तूंची खरेदी करण्यात आली असून, जीइएम पोर्टलवर संबंधित कॅटेगरी उपलब्ध नसताना चुकीच्या पद्धतीने टेंडर काढून निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी करण्यात आले आहे. शासनाच्या मानकांचे उल्लंघन करून कमी दर्जाच्या वस्तू घेऊन सरकारी निधीचा गैरवापर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

तसेच, तांडा वस्ती सुधार योजना अंतर्गत करण्यात आलेली रस्त्यांची कामे अत्यंत उथळ आणि अपूर्ण अवस्थेत असून त्यातही मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अनेक कामे न करता बिले काढण्यात आली आहे.

यासंदर्भात दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी पाथर्डी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आता जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात आली आहे.

# चक्कर येऊन पडल्याने वेटरचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा** : राहुरी फॅक्टरी येथील नगर-मनमाड राज्य मार्गावरील हॉटेलात चक्कर येऊन खाली पडून डोक्याला गंभीर मार लागल्याने वेटरचा मृत्यू झाला. ही घटना काल सोमवार दि. २ जून रोजी घडली. राहुरी फॅक्टरी येथील जयश्री हॉटेलमध्ये देवळाली प्रवरा येथील भाऊसाहेब मुरलीधर पुंड (वय ६५) हे गेल्या अनेक वर्षांपासून वेटरचे काम करत होते. सकाळी पुंड हे नेहमीप्रमाणे काम करत असताना त्यांना चक्कर येवून ते फरशीवर खाली कोसळले. त्यांना गंभीर मार लागला. हॉटेलचे मालक अविनाश साठे व सहकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय सूत्रांनी त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी येथे पाठविण्यात आला.

# समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी आर्थिक मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नगर** : श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी (माध्यमिक विभाग) येथील इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्याअनुश्री दिगंबर गवळी हिचा वाढदिवस यावर्षी एका वेगळ्या व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. इतर कुठलाही खर्च न करता, अनुश्रीच्या वडिल दिगंबर गवळी यांनी आपल्या कन्येच्या हस्ते मंडळाच्या सहकारनगर, सावेडी येथील नवीन समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेस दिला. अनुश्रीचा वाढदिवस एक वेगळा दृष्टिकोन घेऊन पुढे आला. फुगे, केक, गिफ्ट्स नकोत, तर शिक्षणाचा भक्कम पाया रचणाऱ्या शाळेच्या उभारणीत स्वतःचा सहभाग हवा, अशी प्रेरणा देणारा हा सकारात्मक उपक्रम ठरला. गवळी हे एमआयडीसीतील एसीई फिडर्स येथे व्यवस्थापक (मॅनेजर) पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अनुश्रीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपण अशा शाळेच्या उभारणीत सहभाग घेतला आहे, जिथून शेकडो विद्यार्थी भविष्यात समाजसेवेसाठी सिद्ध होतील. ही गोष्ट अनुश्रीला मोठेपणी अभिमान वाटावा अशा पिढी घडवणाऱ्या शाळेसाठी साजरा करण्यात आल्याचे, ते म्हणाले. या स्तुत्य कार्याबद्दल गवळी यांचा किशोर देशपांडे (नवीन समर्थ प्रशालेचे बांधकाम प्रमुख, कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती अध्यक्ष), व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर व प्राचार्या श्रीम. जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षक सुनील कानडे, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते. सर्वांनी अनुश्रीचे व तिच्या कुटुंबाचे अभिनंदन करत ही कृती ज्ञान मंदिर उभारणीला सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

# राहाता पंचायत समितीला पुरस्कार प्रदान

## ग्रामविकास व पंचायतराज विभागातर्फे केला सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : सन २०२३-२४ मध्ये प्रशासकीय कार्यप्रणाली, विकासकामांची अंमलबजावणी आणि लोकाभिमुख उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राहाता पंचायत समितीला नुकताच मुंबई येथील यशवंतराव सभागृह येथे महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायतराज विभागातर्फे विभागस्तरावरील 'उत्कृष्ट पंचायत समि ती' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा सन्मान गटविकास अधिकारी पंडित वाघेरे यांनी राज्याचे महाहिम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, ग्रामविकास व पंचायत राजविभाग मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास व पंचायत राजविभाग राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. राहाता पंचायत समितीने गतवर्षभरात प्रशासकीय पारदर्शकता, लोकाभिमुखता व उत्तरदायित्व या तत्त्वांवर आधारित कार्यपद्धती राबवून एक आदर्श निर्माण केला आहे. पंचायत समितीने उत्कृष्ट कामगिरी, तसेच आयएसओ प्रमाणपत्र, राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचे १०० टक्के प्रभावी अंमलबजावणी साधली आहे. विशेषतः, कुपोषणमुक्त तालुका, बालकांचे पोषण व सर्वांगीण विकास, गुणात्मक शिक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर (जसे की दृश्य-श्राव्य साधने), अशा क्षेत्रांमध्ये भरीव कार्य झाले आहे. उमेद योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यात आले आहे. कृषिपूरक व लघुउद्योगांना चालना देण्यासाठी मूल्यवर्धन, विपणन व प्रोत्साहन या धोरणांवर भर देण्यात आला आहे. यामुळे स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यात यश आले आहे. पंचायत समितीच्या मुख्य कार्यालयात स्वागत कक्ष, हिरकणी कक्ष, अग्निशमन यंत्रणा, फेशियल रेकग्निशन यंत्र, सीसीटीव्ही कॅमेरे, तसेच सेंद्रिय कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. त्यामुळे कामकाज अधिक प्रभावी आणि पारदर्शक झाले आहे.




हा पुरस्कार मिळणेकामी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, राहाता पंचायत समितीच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्याची पावती असून, भविष्यातही अशीच लोककल्याणकारी कामगिरी करण्याचा निर्धार असणार आहे.
**पंडित वाघेरे, गटविकास अधिकारी पं. समिती, राहाता.**

# अवैध दारू विक्रीप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : तालुक्यातील देवीभोयरे येथे दारूबंदीसाठी उपोषण करणाऱ्याच्या घरातच गावठी दारूचा साठा आढळला आहे.




हा प्रकार गुरुवारी (दि. २९) सायंकाळी उघडकीस आला. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल प्रकाश सुभाष बोबडे यांच्या फिर्यादीवरुन पारनेर पोलिस ठाण्यात नितेश जयवंत गायकवाड व विकास जयवंत गायकवाड दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी १ हजार ८०० रुपये किमतीची दारू जप्त केली. ज्या घरात दारू मिळाली आहे ते घर गायकवाड यांच्या चुलत्याच्या नावावर आहे.

याबाबत पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी समक्ष येऊन पाहणी केली. या कारवाईवेळी ग्रामस्थांसह महिलांनी गर्दी केली होती. ही कारवाई पोलिस निरीक्षक समीर बारवकर, सहायक फौजदार अशोक कडूस, पोलिस हेड कॉन्स्टेबल विवेक गुजर, पोलिस नाईक गहिनीनाथ यादव, पोलिस कॉन्स्टेबल सागर धुमाळ, प्रकाश बोबडे, तोरडमल यांच्या पथकाने केली.

# प्रवराकडून नोकऱ्यांबरोबरच स्वयंरोजगाराचीही निर्मिती

## डॉ. सुस्मिता विखे पाटील; प्रवरा एसव्हीआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून नोकरीबरोबरच स्वयंरोजगाराची ही निर्मिती केली जाते. विद्यार्थ्यांनो जीवनामध्ये मोठी यश प्राप्ती करा, असे प्रतिपादन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सिन्नर नाशिक येथील सर विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुमारे दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांची इन्फोसिस, टी. सी. एस, कॉग्निझंट, ग्रोविंग फ्लॉवर्स, एपिटोम आणि लीग्रॅंड अशा विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेली असून या सर्व विद्यार्थ्यांचा संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पाच लाखपासून ते साडे तीन लाखांचे सरासरी पॅकेज सर्वच विद्यार्थ्यांना मिळाले आहे.

नाशिकसह सिन्नर परिसरांतील सामान्य जनतेच्या मुलांना शिक्षण देण्यात सिंध्दु छाया कॅम्प हा शिक्षण क्षेत्रात अव्वल स्थानावर पोहचत आहे. संस्थेचा विद्यार्थी हा शिक्षणांतून आत्मनिर्भर व्हावा. बदलत्या तंत्रज्ञानातून तो सक्षम घडावा. नोकरी सोबत तो नोकरी देणारा ठरावा, यासाठी विशेष प्रयत्न येथे होत आहेत.

यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश शिंदे, प्लेसमेंट विभागाचे प्रा. राहुल सोनटक्के, प्रा. ऋषीकेश भालेराव तसेच सीइओ सेक्रेटरी डॉ. राणा महाजन तसेच सर्व विभागप्रमुख आणि सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

डॉ. सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या की, प्रवरेच्या माध्यमातून सहकारातून समृद्धीकडे हा संदेश आपण घेऊन जावा व सहकाराच्या माध्यमातून झालेले परिवर्तन हे आपण इतरांना सांगावे. तसेच प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून नोकरीबरोबरच स्वयंरोजगाराची ही निर्मिती केली जाते. पुढे त्या म्हणाल्या विद्यार्थ्यांनो जीवनामध्ये मोठी यश प्राप्ती करा परंतु प्रवरेचे नाव हे उंच पदावरती कसे जाईल यासाठी नेहेमी प्रयत्नशील रहा, प्रवरा परिवार कायमच आपल्या सोबत राहिल, असेही आश्वासित केले.

प्राचार्य डॉ. गणेश शिदे यांनी सन २०२४-२५ या कालावधीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा परिचय करून देत असताना विद्यार्थ्यांची प्लेसमेंट व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या अनेक उपक्रमांची माहिती दिली. तसेच संस्थेचे अध्यक्ष मंत्री विखे पाटील यांनी वेळोवेळी राबवलेल्या विविध योजनांची माहिती देत असतानाच संस्थेच्या माध्यमातून नोकरी करणारा आणि नोकरी उपलब्ध करून देणारा विद्यार्थी घडावा, यासाठी संस्था नेहमी प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

### यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांकडून कौतुक

विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, अतांत्रिक विभागाचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, संस्थेचे प्लेसमेंटचे समन्वयक प्रा. मनोज परजणे यांनी अभिनंदन केले आहे.



# आव्हाड महाविद्यालय-महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रामध्ये करार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी करारावर स्वाक्षरी केली.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करियर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर विविध कार्यक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचे सखोल मार्गदर्शन या उपक्रमातून दिले जाते.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे विभागातील करियर कट्टा संलग्न महाविद्यालयांची सहविचार सभा अलीकडेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे येथे पार पडली. या सभेचे उद्घाटन युजीसी-एमएमटीटीसीचे संचालक डॉ. संतोष केंद्रे यांच्या हस्ते झाले.

यावेळी विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. नितीन घोरपडे, प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीश चंद्र सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, प्राचार्य भाऊसाहेब देशमुख, विभागीय समन्वयक डॉ. संजय खिलारे, जिल्हा समन्वयक डॉ. नवनाथ नांगरे, डॉ. भागवत परकळ, करिअर कट्टा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, डॉ. अभिमन्यू ढोरमारे व इतर मान्यवर उपस्थित होते.



या सामंजस्य करारामुळे विविध देशातील मराठी उद्योजकांच्या मार्गदर्शनाचा लाभ बाबूजी आव्हाड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी दिली. या विशेष प्रयत्नांबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष अॅड. सुरेश आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे, करियर कट्टा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सेवानिवृत्तीनंतर जाधवांनी घेतला वृक्षारोपणाचा ध्यास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव परिसरातील लक्ष्मी त्रिंबक मंगल कार्यालय जवळवास्तव्यास असलेले तसेच श्रीरामपूर पंचायत समिती या ठिकाणी ग्रामविकास अधिकारी पदावर तालुक्यात विविध ठिकाणी कर्तव्य बजावलेले टि. के. जाधव सध्या प्रदीर्घ सेवेतून बेलापूर येथुन निवृत्त झाले आहे.



अगदी लहानपणापासून अध्यात्मिक कुटुबांत संगोपन झाल्याने उच्च शिक्षण घेऊन जिल्हा परिषद या माध्यमातून अनेक ठिकाणी कर्तव्य बजावले. या कालावधीत अनेक संस्था, शासकिय, निमशासकिय यांच्याकडून पुरस्कार प्राप्त झाले आहे.

परंतु सेवा समाप्तीनंतर आध्यात्मिक व वृक्षारोपण संवर्धन याविषयी जनजागृती करणार असल्याचा मानस निवृत्त ग्रामविकास अधिकारी टि. के. जाधव यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी त्यांनी काही ठिकाणी वृक्षारोपण करण्याचा त्यांनी प्रयत्नही सुरू केला आहे. या कार्याबद्दल नंदकिशोर शेळके तसेच भजनी मंडळ यांच्याकडून त्यांचा विविध वृक्ष भेट देऊन ठिकाणी सन्मान करण्यात आला.

# पायरेन्समध्ये 'राष्ट्र प्रथम' मोहिमेद्वारे राष्ट्रनिष्ठेचा जागर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : पायरेन्स इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेशन राष्ट्र प्रथम ही विशेष मोहिम राष्ट्राभिमानाच्या आणि देशनिष्ठेच्या भावनेने उत्साहात पार पडली. देशाच्या सुरक्षेसाठी आणि शौर्याच्या प्रतीक असलेल्या ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि पहलगाम येथील घटनेनंतर भारतीय लष्कराने उचललेल्या पावलांचे समर्थन करण्यासाठी, संस्थेच्या विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती फेरीतून देशभक्तीचा जागर केला.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणे, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचवणे आणि जबाबदार नागरिकत्वाचे भान निर्माण करणे हा होता.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या संकल्पनेतून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे-विखे पाटील, संस्थेचे सचिव आणि संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते त्याचाच एक भाग पायरेन्स आयबीएमएमध्येही विशेष मोहिम आयोजित करण्यात आली.

### राष्ट्र प्रथम सामाजिक बांधिलकीचे प्रतीक

राष्ट्र प्रथम हीच माझी प्रेरणा राहील अशीविद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. या उपक्रमात एमबीए, एमसीए, बी.व्होक या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल येथील कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हा उपक्रम संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला.

राष्ट्र प्रथम संकल्पना विद्यार्थ्यांना देशहितासाठी सजग आणि सक्रिय राहण्याचे आवाहन केले. ही संकल्पना म्हणजे राष्ट्र सर्वोच्च-प्रत्येक कृती राष्ट्रहितासाठीच असावी, हीच भावना रुजवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

**- डॉ. मोहसीन तांबोळी, संचालक- आयबीएमए**

# केडगाव अंबिकानगर ओढ्यावरील अतिक्रमण हटवा

## स्थानिक लोकप्रतिनिधीने ओढा बुजविल्याचा आरोप; ग्रामस्थांचे दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगाव अंबिकानगर येथील सर्व्हे नंबर ५११ व ५१२ मधील नैसर्गिक ओढ्यावर झालेल्या अतिक्रमणाबाबत तात्काळ कार्यवाही करून ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याची मागणी केडगाव ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

ग्रामस्थांनी काल जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधीने सदर नैसर्गिक ओढा बुजवला असून, अनेकवेळा तक्रार करुनही महापालिका प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप करण्यात आला.



यावेळी संदीप कोतकर युवा मंच अध्यक्ष भूषण गुंड, राजू लाळगे, पप्पू हुलगे, विलास हुलगे, सागर कोकणे, तन्मय रासने, राजू बोरगे, पप्पू मंत्री, आदिनाथ भोर, सुभाष लाळगे, सविता गाडगे, विमल कोकणी, प्रियांका शहाणे, कल्पना हजारे, सुनीता हुलगे, लक्ष्मी बोरगे, निशा बोरगे, उषा शिंदे, मीरा उदागे, अनिता पुंडलिक, ललिता पवार, अनिता खुरचेकर, पमा भोर, रागिणी शिंदे, आशा गवळी, गौरी लाळगे, ज्योती पवार, कांता पवार, मनीषा कोकणे, प्रभा साखरे, आशविनी बोरगे, अश्विनी शहाणे आदींसह केडगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हेमंत ढगे यांनी २०२३ मध्ये केलेल्या तक्रारीनुसार महापालिकेने नगर-पुणे महामार्गावरील केडगाव नेप्ती रस्त्यालगत खलील गॅरेज शेजारी असणारा ओढा बुजवून ते गिळकृंत करण्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. ओढा बुजवून तेथे बंदिस्त ड्रेनेज लाईनचे पाईप टाकून काम पूर्ण केले असून, सदर ओढा बुजविला असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पाहणी दरम्यान निदर्शनास आले.

### ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांचे वेधले लक्ष

प्रभाग अधिकारी यांनी विजय पठारे व राजू पठारे यांना २९ मे २०२४ रोजी संबंधित कागदपत्रे जमा करण्याचे लेखी पत्र दिले होते. मात्र यासंदर्भात देखील कारवाई झाली नसल्याचे ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले.

### नुकसान भरपाई मिळण्याची मागणी

सर्व्हे नंबर ५११ व ५१२ मधील ओढ्यावर झालेले अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे, ओढ्याचं नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा, सांडपाण्याची नियोजनबद्ध व्यवस्था करावी, ओढा बुजवून अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, पूरस्थिती व हानी झालेल्या नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामा करुन नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केडगाव ग्रामस्थांनी केली आहे.

# साहेब, कुणी घर देता का घर

## आदिवासी पारधी समाजाचे पंचायत समिती कार्यालयाबाहेर आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : तालुक्यातील बारडगाव सुद्रिक येथील आदिवासी पारधी समाजाच्या छपरामध्ये नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी शिरले. यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. यामुळे आम्हाला हक्काचे घरकुलासाठी जागा मिळावी, यासाठी कर्जत पंचायत समितीच्या कार्यालयाबाहेर पारधी विकास कृती समितीच्यावतीने कोणी घर देता का घर असे म्हणत या आदिवासी समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनामध्ये पारधी विकास कृती समितीचे जिल्हाध्यक्ष तुकाराम पवार, राहुल पवार, दिसेना पवार, शितल काळे, रवींद्र काळे, अश्विनी काळे, गणेश पवार, राहुल पवार, उमेश काळे, प्रियांका पवार, भाग्यश्री पवार, शकुंतला काळे, चंपा पवार, रमेश काळे, बबली काळे यांच्यासह मोठ्या संख्येने अनेक जण सहभागी झाले होते.

तुकाराम पवार म्हणाले, कर्जत तालुक्यातील बारडगाव सुद्रिक येथील रवींद्र गंडीशा काळे यांना घरकुल मंजूर आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना घरकुल बांधण्यासाठी जागा देण्यात येत नाही. ती केवळ आदिवासी पारधी आहेत, म्हणून त्यांची अडवणूक करण्यात येत आहे. ती सध्या ज्या जागेवर वीस ते पंचवीस वर्षांपासून राहत आहे. त्या ठिकाणी त्यांना घरकुल बांधण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी आहे. जोपर्यंत मागणी मान्य होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरू राहील, असे पवार म्हणाले. शकुंतला काळे व बबली काळे यांनी देखील आपल्या अडचणी आणि समस्या मांडल्या. गटविकास अधिकारी रूपचंद जगताप यांनी आंदोलकांशी चर्चा करून त्यांचा प्रश्न लवकरात लवकर सोडू, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# अहिल्यादेवींचे विचार तरुण पिढीसाठी प्रेरणादायी

## सागर बेग; राहाता येथे अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरते आणि प्रत्येक भारतीयाने याचा अभिमान बाळगावा, असे प्रतिपादन राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी केले.

भारताच्या इतिहासात आपल्या अद्वितीय सामाजिक, धार्मिक आणि राजकारणातील कार्याने अढळ स्थान मिळवलेल्या अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राहाता येथील वीरभद्र मंदिरात राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने एक भव्य जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर बेग यांनी उपस्थितांना उद्देशून प्रभावी आणि अभ्यासपूर्ण भाषण केले.

सागर बेग म्हणाले की, जिहादी मोगल आक्रमकांनी नष्ट केलेल्या अनेक हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार अहिल्याबाईंनी केवळ भारतातच नव्हे, तर आज पाकिस्तान व बांगलादेश या वेगळ्या मुस्लिम राष्ट्रांमध्येही केला असल्याचे दिसते. त्यांनी या मंदिरांना पुन्हा पवित्र करून श्रद्धेचे केंद्र बनवले. हे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरते आणि प्रत्येक भारतीयाने याचा अभिमान बाळगावा.

अहिल्याबाईंनी नद्यांवर घाट बांधले, मंदिरांना जमिनी दान दिल्या. दिवाबत्तीची कायमस्वरूपी व्यवस्था केली. त्या कट्टर शिवभक्त होत्या. परंतु त्यांची भक्ती संकुचित धार्मिकतेपुरती मर्यादित नव्हती. त्या युद्धकला, प्रशासन आणि राजकारण या सर्वच क्षेत्रात पारंगत होत्या.

**- सागर बेग, अध्यक्ष : राष्ट्रीय श्रीराम संघ**

यावेळी राष्ट्रीय श्रीराम संघाचे आकाश बेग, तालुकाध्यक्ष मदन भाऊ मोकाटे, राहाता शहराध्यक्ष निलेश गिधाड, दीपक पोकळे, योगेश निकम, महेश कोते, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ, मुकुंद सदाफळ, सोपान सदाफळ,भाऊसाहेब धुमसे, संपत जाधव, डॉ. रघुनाथ बोठे, राजेंद्र गायकवाड, मारुती गिधाड, साहेबराव निधाने यांच्यासह आदी उपस्थित होते.



कार्यक्रमात अहिल्याबाईंच्या कार्याची माहिती देण्यात आली आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजसेवा करण्याचा संकल्प अनेकांनी व्यक्त केला. राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या जयंती उत्सवाने राहाता शहरात धार्मिक व सांस्कृतिक चेतना जागृत केली.

# वारकरी परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी पाचरणे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अखिल विश्व वारकरी परिषदेच्या प्रदेश कार्यध्यक्षपदी येथील साहेबराव पाचरणे याची निवड करण्यात आली. तसे पत्र प्रदेशाध्यक्ष नितीन सातपुते यांनी त्यांना दिले. त्यांच्या निवडीबद्दल नालेगाव येथील धर्मवीर संभाजी युवा प्रतिष्ठानच्या वतीने मा. नगरसेवक अजय चितळे यांनी त्याचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी दत्ताभाऊ वामन, विनायक वाघ, विशाल बेरड, अतुल वामन आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, ह.भ.प. साहेबराव पाचरणे यांची अखिल विश्व वारकरी परिषदेच्या प्रदेश कार्याध्यक्ष यापदी निवड करण्यात आली आहे. ही निवड १ जून २०२५ पासून तीन वर्षासाठी असेल. वारकरी सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच समाजप्रबोधनातून सकळ जनांचे कल्याण ही परिषदेची विचारधारा आहे. या विचारधारेला अनुसरूनच आपल्या आजवरच्या कार्याची वाटचाल सुरू आहे. आपल्या हातून हे कार्य भविष्यात आणखी जोमाने होईल, यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.



# आता तक्रार आल्यास शिक्षकांची होणार बदली

## शासनाचा नवा आदेश; बदलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शैक्षणिक दर्जा सुधाराव यासाठी शासनाचे युध्दपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. सध्या अनेक अनुदानीत शाळेंच्या शिक्षकांबाबत पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. याच पार्श्वभुमीवर आता सरकारने कडक भुमिका घेतली आहे. एखाद्या शिक्षकाविषयी शासनाकडे तक्रार आल्यास ३० दिवसांच्या आत चौकशी करून बदलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना पाठवावा लागणार आहे. शिक्षण विभागाच्या या आदेशाने शिक्षकांची चिंता वाढली आहे.



ग्रामीण भागात काम करताना शिक्षक शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र, काही कारणांतून शिक्षकांबद्दल पालक किंवा ग्रामस्थ तक्रारीही करतात. परंतु अशा तक्रारींवर आतापर्यंत चौकशी होऊन शिक्षकास समज देणे किंवा प्रकरण गंभीर असेल तर संबंधिताचे निलंबन केले जात होते. परंतु, आता तक्रार झाल्यास थेट बदलीलाच सामोरे जावे लागणार आहे. शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास शासनाच्या नियमानुसार संबंधित शिक्षकांची चौकशी करून त्या शिक्षकांच्या बदलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना पाठवावा लागणार आहे. त्यानंतर शिक्षकांची बदली करण्यात येणार आहे. याबाबत राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे.

या निर्णयाने जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांची चिंता वाढली आहे. चौकशीनंतर, तक्रार गंभीर आढळल्यास शिक्षकाची बदली करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला जाऊ शकतो. तक्रार प्राप्त झाल्यावर संबंधित अधिकाऱ्याने त्वरित चौकशी सुरू करणे आवश्यक आहे. या चौकशीमध्ये तक्रारदारांची बाजू, शिक्षकाची बाजू व इतर आवश्यक पुरावे तपासले जातात. चौकशीत शिक्षकांविरुद्ध गंभीर आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्याने शिक्षकाची बदली करण्याचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या प्रस्तावात चौकशी अहवाल, शिक्षकांविरुद्धची पुरावे आदी बाबी यात नमूद असाव्यात. विभागीय आयुक्त याबाबत बदलीचा निर्णय घेतील.

### अहवाल वरिष्ठांना देणार

चौकशी पूर्ण झाल्यावर संबंधित राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. अधिकाऱ्याने अहवाल तयार करून या अहवालात चौकशीचे निष्कर्ष, पुरावे आणि शिक्षकांवरील आरोप स्पष्टपणे नमूद केलेले असावेत, असे शासन निर्णयात नमूद केले आहे. शिक्षकांच्या वर्तनाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास चौकशी करणे आणि आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढते आणि विद्यार्थ्यांचे संरक्षण होते.

# केबलसाठी रस्त्यावर बेकायदा खोदकाम

## मोबाइल कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : शहरातील बहुतांश रस्ते अगोदरच खड्डेमय झालेले असताना एका टेलिफोन कंपनीच्या केबलसाठी रस्त्याच्या कडेला खोदकाम सुरू आहे. रस्त्याच्या मध्यापासून पंधरा मीटरवर खोदकाम करण्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा नियम पायदळी तुडवत अनधिकृत खोदकाम करण्यात आले आहे. यामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. संबंधित मोबाइल कंपनीसह ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे. विशेष म्हणजे खोदाईसाठी परवानगीबाबत पालिकेच्या मुख्याधिकाऱ्या सह अभियंतांनाही माहिती नाही. मुख्याधिकाऱ्यां परवानगीबाबत पालिका अभियंता यांना विचारावे असे सांगितले. पालिका अभियंता यांना विचारले असता सहा महिन्यांपूर्वी एक कंपनीला परवानगी दिली होती. त्याचे किती पैसे भरून घेतले याबाबत आणि परवानगी कुणाला दिली.



रस्त्याच्या मध्यापासून पंधरा मीटरवर खोदकाम करण्याचा नियम डावलून अनेक ठिकाणी साईडपट्टीवरच खोदकाम सुरू असल्याने प्रवाशांच्या जीवितास धोका होऊ शकतो. यामुळे रस्त्याच्या साईडपट्ट्यांची चाळण होत असून, साईडपट्ट्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे. याची माहिती विचारली असता बांधकाम विभागातील संबधित कर्मचारी दहा दिवसांपासून रजेवर आहे. त्याच्याकडे परवानगीबाबत माहिती मिळेल असे सांगण्यात आले. श्रीगोंदा शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग, जामखेड रोड, मांडवगण रोड अनेक ठिकाणी एका म ोबाईल कंपनीच्या केबलसाठी खोदले आहेत. काही ठिकाणी रस्त्याच्या लगत साईड पट्ट्या खोदताना डांबरी रस्ते उखडले आहेत. नको तिथ खोदाई केली असल्याने नव्याने स्पीड ब्रेकर तयार झाले आहेत. संबंधित मोबाईल कंपनीच्या केबलसाठी रस्ते आणि रस्त्याच्या बाजूच्या साईड पट्ट्या खोदल्या असून पावासाने रस्ते आणि साईडपट्ट्या खचल्या आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

# जिल्हा रुग्णालयात कर्करोग जागृतीवर चर्चासत्र

## तंबाखू नियंत्रण कार्यक्रम; तंबाखूमुक्तीची शपथ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त शनिवारी जिल्हा रुग्णालयात कर्करोग जनजागृती उपचार चर्चासत्राचे आयोजन केले होते. यावेळी कॅन्सर तज्ज्ञ डॉ. सतीश सोनवणे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नेहरकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्रीकांत पाठक, इंडियन डेंटल असोसिएशन सेक्रेटरी डॉ. तलरीजा, डॉ. डुंगरवाल, डॉ. ओंकार भालसिंग तसेच यशवंतराव चव्हाण दंत वैद्यकीय महाविद्यालय डॉ. आंधळकर व विद्यार्थी, जिल्हा विधी प्राधिकरणाचे सदस्य ॲड. अनुराधा येवले आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हा विधी व न्याय सेवा जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात कर्करोग जनजागृती उपचार चर्चासत्राचे आयोजन केले होते. इंडियन डेंटल असोसिएशन यांनी मौखिक आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण दंत वैद्यकीय महाविद्यालयाने व्यसनमुक्तीपर पथनाट्य सादर केले. यावर्षी आकर्षणाचा मुखवटा उतरू या, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या विक्रीसाठीच्या क्लृप्त्या उघड करूया, असे घोषवाक्य तयार करण्यात आले आहे.



जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे डॉ. हर्षल पठारे यांनी तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांची माहिती दिली. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था विभागीय समन्वयक अन्नपूर्णा ढोरे यांनी तंबाखूचे व्यापार, विक्री, नियमन व स्पॉन्सरशिपविषयी माहिती दिली. जिल्हा असंसर्गजन्य रोग नियंत्रण कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण सोनवणे तसेच वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) वलांडे, डॉ. सुरेश घोलप, जिल्हा कार्यक्रम समन्वयक एनसीडी तसेच तंबाखू नियंत्रण कार्यक्रम चे जिल्हा समुपदेशक गणेश शिंदे व दत्तात्रय जटाडे आदींचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# ऋषी, साहित्यिक जगाच्या काल्याणार्थ

## डॉ. बाबुराव उपाध्ये; लोककलावंत साहित्य परिषद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : मानवी संस्कृती ही सहजीवन आणि समर्पित सेवेतून आकाराला आली असून त्यामध्ये प्राचीन ऋषी-मुनी, संत, सम ाजसेवक आणि साहित्यिक यांचे जीवनध्येय जगाच्या कल्याणार्थ असून देतो तो देव स्वरूपाचे असल्याचे प्रतिपादन साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील त्र्यंबकेश्वर मंदिर भव्य सभागृहात प. पू. काटेस्वामीजी व्यासपीठ, लोककला कलावंत साहित्यिक परिषद व बहुजन समाज संघटना महाराष्ट्र राज्यद्वारा आयोजित श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज एक दिवशीय साहित्य संमेलनच्या समारोप अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबुराव उपाध्ये बोलत होते.

उद्घाटक म्हणून उक्कलगाव येथील ह.भ.प. बाबा म हाराज ससाणे होते तर स्वागताध्यक्ष म्हणून राहाता येथील साहित्यिक राजेंद्र फंड, प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य टी. ई. शेळके, ह.भ.प. भागवतराव मुठे महाराज, सरपंच चंद्रकला पवार, साहित्यिक सायमन भारस्कर, रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुभाष त्रिभुवन, सचिन पवार, पाथर्डीचे कवी बाळासाहेब कोठुळे, ह.भ.प. मरकड म हाराज, ह.भ प. सोळसे म हाराज, शाहीर भारत गाडेकर, प्रा. शिवाजीराव बारगळ, कवी पोपटराव पटारे, ॲड्. प्रा. आदिनाथ जोशी, कवयित्री संगीता फासाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बालमृत्यू रोखण्यासाठी सुकाणू समितीची बैठक

## पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आजारांवर नियंत्रणासाठी उपाययोजनांवर चर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : राज्यातील बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाय योजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. देशात पाच वर्षाखालील मुलांच्या अतिसारामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण हे ४.८ टक्के आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने २०२५ - अतिसार रोखा मोहीम २०२५ सुरू केली असून ही मोहीम राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचित केले आहे. शासन निर्देशानुसार अहिल्यानगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अतिसार रोखा मोहीम २०२५ यशस्वीरित्या राबवण्यासाठी महापालिकास्तरीय सुकाणू समितीची बैठक उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. बालकांमध्ये उद्भवणाऱ्या अतिसाराच्या समस्या रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याबाबत या सुकाणू संमतीच्या बैठकीत सूचना देण्यात आल्या. याचबरोबर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या डेंग्यू, झिका, मलेरिया आदी साथजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.



# मांजरी येथे होळकर जयंती साजरी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी (३०० वा जन्मवर्ष) महोत्सवानिमित्त मांजरी येथे विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांनी साजरा झाला. गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि स्थानिक संस्थांचा सहभाग यामुळे संपूर्ण गावात सणासारखे वातावरण होते.या भव्य महोत्सवाचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान मांजरी, चंद्रगिरी तरुण भजनी मंडळ, आणि अण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठान देवळाली प्रवरा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. सेवावर्धिनी पुणेचे प्रकल्प अधिकारी अमोद काटीकर यांनी 'अहिल्यादेवी वारसा पुनर्संचयित प्रकल्प' बारव संवर्धन यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे संचालक भरत निमसे आणि संचालिका अनुराधा भुजाडी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालिनी विटनोर होत्या. या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच, उपसरपंच सोसायटीचे चेअरमन सर्व संचालक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ व मातृशक्ती बहुसंख्येने त्याने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण विटनोर यांनी केले. या कार्यक्रमास अशोक विटनोर, गोरख विटनोर भारत विटनोर, पाटीलबा बाचकर, भाऊसाहेब विटनोर, प्रवीण विटनोर, किरण विटनोर, बापू विटनोर, किशोर बाचकर, सीताराम विटनोर, अशोक वाघमोडे आदी तसेच अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे कार्यकर्ते चंद्र गिरी भजनी मंडळ, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# उपचार मिळाल्याने जखमी अजगराला जीवदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : तालुक्यातील राणेगाव येथे जखमी अवस्थेत आढळलेल्या अजगरावर वेळेत उपचार मिळाल्याने त्याला जीवदान मिळाले.

राणेगाव येथे ३० मे रोजी जेसीबीच्या साहाय्याने पाइपलाइनचे काम सुरू असताना कामगाराना एक मोठा अजगर आढळून आल्याने त्यांची चांगलीच घाबरगुंडी उडाली.

यावेळी सर्पमित्र विशाल गोरे व साहील शेख यांना माहिती दिल्यानंतर ते घटनास्थळी दाखल झाले. अजगराला पकडले तेव्हा जखमी झालेला होता. याबाबतची वनविभागाला देण्यात आली. वनविभागाचे सागर साळवे व सर्पमित्र सुशांत मनवरे यांनी जखमी अजगराला उपचारासाठी शेवगाव येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखल कले. तेथे पशुधन विकास अधिकारी डॉ. कल्पना गोवर्धन पवार यांनी तत्काळ अजगरावर उपचार केले. यावेळी डॉ. पवार यांनी सांगितले, हा साप भारतीय अजगर असून, तो पूर्णतः विषारी नसतो. या प्रजातीस इंडियन रॉक पायथन किंवा आशियाई रॉक पायथन असेही संबोधले जाते.



साधारणतः असे अजगर ३ मीटरपर्यंत लांब असतात. लहान प्राणी, उंदीर, हरिण, माकडे, कुत्रे व कोल्हा यांचे ते भक्षण करतात.

उपचारानंतर हा अजगर वन विभागाच्या ताब्यात देण्यात आला.

# श्रीरामपूर-परळी रेल्वेमार्गाचा मुख्यमंत्र्यांना विसर

## रेल्वे कृती समितीचा आरोपः रेल्वे मार्गाला मंजुरी नाहीच

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तिशः लक्ष घालून डिसेंबर २०१७ मध्ये केंद्र सरकारकडे राज्य शासनाच्यावतीने श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गासाठी शिफारस करतो असे लेखी आश्वासन कुकाणा येथील रेल्वे कृती समितीला दिलेले होते. या आश्वासनाचा विसर राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पडला आहे की, काय? असा सवाल रेल्वे कृती समिती व जनतेतून विचारला जात आहे. याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की, १०४ वर्षे प्रलंबित असलेल्या श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गाच्या पूर्णत्वासाठी सन २०१७ मध्ये आम रण उपोषण करण्यात आले होते. हे उपोषण सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी समितीला लेखी आश्वासन दिलेले होते. या आश्वासनाला आठ वर्षे पुर्ण होऊनही याबाबत कुठलीच कार्यवाही झालेली नाही.



तीन वर्षापासून मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या श्रीरामपूर-परळी रेल्वे मार्गाला मंजुरी कधी मिळणार? असा सवाल आता जनता लोकप्रतिनिधी आणि सरकारकडे विचारणा करत आहे. १०४ वर्षे प्रलंबित असलेल्या श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण पुर्ण होऊन सर्वेक्षण अहवाल जून २०२२ मध्ये केंद्रिय रेल्वे बोर्डाकडे पाठविण्यात आलेला आहे.

मात्र तेव्हापासून हा रेल्वे मार्ग अद्यापही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. या रेल्वे मार्गाच्या मागून छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर तसेच राहुरी ते शनिशिंगणापूर हे दोन नवीन रेल्वे मार्ग मंजूर झालेले आहेत. परंतु श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गास जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले जात असल्याचा आरोप आता कृती समितीकडून केला जात आहे. जमीन अधिग्रहण माती भराव पुर्ण असूनही या मार्गाला मंजुरी मिळत नाही. या उलट नव्याने जमि नी विकत घेण्याची गरज असलेल्या रेल्वे मार्गांना तयार करण्याची परवानगी एकीकडे मिळत आहे. या मागचे नेमके षडयंत्र काय? असा सवालही आता कृती समितीकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीरामपूर - परळी रेल्वे मार्ग हा शिर्डी नगर बीड लोकसभा म तदारसंघातून जातो. परंतु शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे वगळता नगरचे खासदार निलेश लंके आणि बीडचे खासदार बजरंग सोनवणे या रेल्वे मार्गाबाबत चकार शब्दही बोलत नसल्यामुळे नगर व बीडच्या खासदारांबाबत कृती समितीकडून शंका उपस्थित केली जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शब्द पाळणारे नेते आहेत त्यांनी दिलेले आश्वासन ते पुर्ण करतील ही अपेक्षा आहे.

**रितेश भंडारी, सचिव, रेल्वे प्रवासी सेवा संस्था**

# प्रयोगशाळा संघटनेचे अहवाल बंद आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संवर्ग संघटनेच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने जिल्ह्यात अहवाल बंद आंदोलन सुरू केले आहे. संघटनेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राज्याध्यक्ष प्रतीभा पाटील, उपाध्यक्ष स्वप्नील जाधव आणि सरचिटणीस अशोक तोडमल यांनी निवेदनाद्वारे दिला. निवेदनात म्हटले आहे की, दि. ७ जूनपासून हिवताप कामकाजव्यतिरिक्त अन्य कामे बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच पुणे विभागाचे संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्या कार्यालयासमोर १६ जून रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.



जिल्हा परिषद हस्तांतरण, १६ फेब्रुवारी २०२४ चा नियुक्ती प्राधिकरणाबाबतचा शासन निर्णय रद्द करावा, शासन निर्णयातील त्रुटी दूर करून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांना आरोग्य पर्यवेक्षक, अवैद्यकीय आरोग्य अधिकारी व जिल्हा हिवताप अधिकारी या पदावर पदोन्नती मिळावी, आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तिसरा हप्ता तत्काळ मिळावा, सेवा प्रवेश नियम व आकृतिबंध याबाबतची अंमलबजावणी करताना प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश करावा, सुधारित आकृतिबंधामध्ये सर्व तालुके, जिल्हा रुग्णालय व जिल्हा प्रशिक्षण केंद्रांमध्ये आरोग्य पर्यवेक्षकांची पदे निर्माण करावीत, जिल्हा हिवताप अधिकारी व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी पदे पदोन्नतीने भरावीत, बदल्या व पदोन्नती समुपदेशनाने करावी, बायोमेट्रिक व फेसरीडिंग उपस्थितीनुसार वेतन ही प्रणाली बंधनकारक करू नये, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी संघटनेचे संजय नरवडे, ज्ञानेश्वर मोटकर, गणेश महाजन, प्रफुल्ल देशमुख आदी उपस्थित होते.




# सर्दी आणि फ्लू एकत्र?

आदल्या दिवशी शिंक आल्यानंतर दुसऱ्या दिवशी तुम्ही तापाने फणफणत असता. सर्दी आणि फ्लूची लागण होण्याचा काळ आता सुरू झाला आहे. आपल्यापैकी कोणीही तो टाळू शकत नाही. तसंच कितीही घरगुती उपचार केले, डॉक्टरांकडून औषधं घेतली तरी व्हायरल जंतूसंसर्ग पूर्णपणे बरा होण्यासाठी काही कालावधी जावाच लागतो. व्हायरल जंतूसंसर्गाला एकत्रितपणे सर्दी आणि फ्लूचा हंगाम असं म्हटलं जातं. सर्दी आणि ताप यांचा संसर्ग एकत्रितपणे होऊ शकत नाही, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात गळकं नाक, सर्दी आणि तीव्र स्वरूपाच ताप अशी लक्षणं एकत्रितपणे दिसू लागतात. यासोबतच अशक्तपणा आणि अंगदुखीही असते. सोप्या शब्दात सांगायचं तर फ्लू आणि सर्दी एकाच कुटुंबातल्या विषाणूंमुळे होत असले तरी एका विषाणूचा प्रतिकार करताना आपली प्रतिकारशक्ती दुसऱ्या विषाणूविरोधात तिच सुरक्षा देऊ शकत नाही. सर्वसाधारणपणे सर्दी ही सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या ऱ्हिनोव्हायरसमुळे होते तर फ्लूचा



प्रसार इन्फ्लूएंझा विषाणूंमुळे होतो. हे विषाणू वेगवेगळ्या प्रकारचे असतात. या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर रोगप्रतिकारक शक्ती वेगळ्या पद्धतीने प्रतिसाद देते. पहिल्यांदा रोगप्रतिकारक पेशी विषाणूची ओळख पटवतात. मग त्यांचा प्रसार थांबवण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या टप्प्यात रोगप्रतिकारक शक्ती आपल्या सुरक्षा प्रणालीचा वापर करून प्रत्यक्ष विषाणूला लक्ष्य करायला बघते. हे जुळून आलं तर शरीर विषाणूंचा ठराविक वेळेत प्रतिकार करतं. त्याच वेळी शरीर अशक्त आणि कमकुवत झालं असताना दुसऱ्या विषाणूला सहज प्रवेश करायला वाव असतो. त्यामुळे थंडी आणि फ्लू हे विकार एकाच वेळी उद्भवू शकतात. याला सुपरइन्फेक्शन असं म्हटलं जातं.

रूग्णाला सुपरइन्फेक्शन झालं तर शरीराची रोगप्रतिकारशक्ती हादरते आणि वेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देते.

कोणत्याही रूग्णाला सर्दी आणि फ्लूचा एकत्रितपणे सामना करता येत नाही. अशा वेळी प्रतिकारशक्तीला मदतीला यावं लागतं. अशा परिस्थितीत रोगप्रतिकारक पेशी विषाणूविरोधी स्थिती निर्माण करतात. यामुळे विषाणूंना अटकाव होतो. त्यांना शरीरात पसरायला फारसा वाव नसतो. या पेशी विषाणूंना प्रतिकार करतात. दुसऱ्या टप्प्यात पेशी विषाणूंना लक्ष्य करतात. विषाणू शरीराच्या बाहेर पडण्याआधी रोगप्रतिकारक पेशींनी त्यांना लक्ष्य केलेलं असतं. सुपरइन्फेक्शनला प्रतिबंध करण्यासाठी रोगप्रतिकारशक्तीची क्षमता वाढवणं गरजेचं आहे.

**व्याधी विचार**

नैसर्गिक उपायांनी रोगप्रतिकारक शक्ती बळकट करता येऊ शकेल. दुसरा मार्ग म्हणजे फ्लूची लस घेणं. यामुळे अत्यंत सक्षम अशा इन्फ्लूएंझा विषाणूविरोधात तुम्हाला संरक्षण मिळेल. तसंच हा विषाणू इतर लोकांमध्ये पसरण्यालाही अटकाव होईल.

# अयोग्य आहार आजाराचे कारण

**डॉ. मेघा पठारे**

**चिन्मय प्रभू**

देशामध्ये ५६.४ टक्के अस्वास्थ्यकर आहार हे आजारांचे कारण आहे. 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल इन्स्टिट्यूट'ने १३ वर्षांच्या अभ्यासानंतर लोकांच्या खाण्याच्या सवयींबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आरोग्यदायी जीवनशैली पाळल्यास आजारांमुळे होणारे मृत्यू टाळता येऊ शकतात, असे संस्थेचे म्हणणे आहे. मार्गदर्शक तत्त्वे सांगतात, की एखाद्या व्यक्तीला निरोगी राहण्यासाठी दररोज १,२०० ग्रॅम खाणे आवश्यक आहे. हे सुमारे २,००० कॅलरीज प्रदान करते. ताटात १०० ग्रॅम फळे, ४०० ग्रॅम हिरव्या भाज्या, ३०० मिली दूध किंवा दही, ८५ ग्रॅम डाळी किंवा अंडी, ३५ ग्रॅम काजू-बिया आणि २५० ग्रॅम धान्य पुरेसे आहे.

एका दिवसात २७ ग्रॅमपेक्षा जास्त तेल खाणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. मांसाहार करणाऱ्यांसाठी, दिवसाला जास्तीत जास्त ७० ग्रॅम चिकन किंवा मांस पुरेसे आहे. तुपापेक्षा मोहरीचे तेल जास्त फायदेशीर आहे मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आपल्या अन्नामध्ये तीन प्रकारचे फॅटी ॲसिड असतात. त्यात 'सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड, 'मोनो अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड' आणि 'पॉली अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड' समाविष्ट आहेत. जास्त सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडस् कॅलरीचे प्रमाण वाढवते.

कॅलरीज वाढल्याने हृदयरोग आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. याशिवाय ट्रान्स फॅट टाळण्याचाही सल्ला देण्यात आला आहे. तूप, पाम तेल आणि खोबरेल तेलामध्ये सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडचे प्रमाण सर्वाधिक असते. मोहरीच्या तेलात ते कमी प्रमाणात आढळते. म्हणजे तुपापेक्षा मोहरीचे तेल तुमच्यासाठी जास्त फायदेशीर आहे. मुलांवर अस्वस्थ आहाराचा परिणाम होत आहे. त्यामुळे लहान वयातच जास्त वजन, लठ्ठपणा आणि मधुमेहाचा त्रास त्यांना होत आहे. वाढत्या धोक्यांमुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आरोग्यदायी खाद्यपदार्थांपेक्षा चरबी, साखर आणि मीठ जास्त असलेले खाद्यपदार्थ आता बाजारात सहज उपलब्ध आहेत. अस्वास्थ्यकर खाद्यपदार्थांच्या जाहिराती आणि मार्केटिंगमुळे हे खाद्यपदार्थ अधिक लोकप्रिय झाले आहेत आणि आजारांना कारणीभूत ठरत आहेत. अभ्यासातून असे दिसून



आले आहे, की सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना सेरेलॅक देणे प्रतिबंधित आहे.

'आयसीएमआर' अहवालाने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये हे नाकारले आहे. बसून पाणी प्यायल्यावर त्रास होत नाही तसेच उभे राहूनही पाणी पिणे चांगले आहे, असे अहवालात म्हटले आहे. 'आयसीएमआर'ने बॉडी मास वाढवण्यासाठी प्रोटीन सप्लिमेंट टाळण्याचा सल्ला दिला आहे. साखर, अंडी, दुग्धजन्य पदार्थ, सोया यासारख्या गोष्टी प्रोटीन सप्लिमेंटमध्ये वापरल्या जातात. याचे दररोज सेवन करणे म्हणजे आरोग्य धोक्यात घालण्यासारखे आहे. मातीचे भांडे स्वयंपाकासाठी सर्वात सुरक्षित आहे. हे इको फ्रेंडली आहेत. स्वयंपाक करताना तेलाचा कमी वापर होतो आणि अन्नाचे पोषण अबाधित राहते. चटणी, दही, सांबार यांसारखे आम्लयुक्त पदार्थ धातूच्या भांड्यांमध्ये ठेवू नयेत, असे अहवालात म्हटले आहे. स्टीलची भांडी वापरायला हरकत नाही. त्यातील रसायने अन्नात जात नाहीत. अन्न १७० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त शिजवले जाते, तेव्हा नॉन-स्टिक भांड्यांचा धोका उद्भवतो. या भांड्याचा लेप झिजतो तेव्हा त्याचा वापर बंद केला पाहिजे.

# कारमध्ये कॅन्सर निर्माण करणारी रसायने

**डॉ. महेश दळे**

गेल्या दशकात कार खरेदी करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे; पण कार वापरल्याने आरोग्य बिघडू शकते. या संदर्भात एक संशोधन करण्यात आले आहे. कारमध्ये कॅन्सर निर्माण करणारी रसायने असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकेत झालेल्या एका अभ्यासात ही बाब समोर आली आहे. ती चिंताजनक आहे. सर्वात धोकादायक रसायन कारचे सीट बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फोममध्ये वापरले जाते. कार सीट कव्हरमध्ये अग्निरोधक रसायने वापरली जातात. हे रसायन श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करते आणि कर्करोग होऊ शकते. पर्यावरण विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अभ्यासात हा दावा करण्यात आला आहे.

भारतात वापरल्या जाणाऱ्या सीट कव्हर्समध्ये किंवा सीटला मूळ आकार देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फोममध्ये या रसायनाचा वापर नगण्य असल्याचा दावा भारतातील फोम पुरवठादार करतात. कव्हर्स बसवल्यानंतर त्याचा प्रभावही संपतो; परंतु अभ्यासानुसार या फोम्समुळे रासायनिक घटक वाहनाच्या आत हवेत विरघळतात. ते श्वासाद्वारे तुमच्या शरीरात जातात. याचा अर्थ, तुम्ही तुमच्या कारमध्ये जास्त बसलात तर कर्करोगासारख्या आजारांचा धोका जास्त असतो.

संशोधनात असे म्हटले आहे, की वापरकर्त्याने दररोज कार चालवली, तर तो दररोज सरासरी एक तास कारमध्ये घालवतो. या वेळी, कारच्या सीटमध्ये असलेल्या स्वरूपात रसायने श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करतात. परदेशात अग्निरोधक अनिवार्य आहे; परंतु लहान आग रोखण्यासाठी त्याचा वापर केला जातो. भारतात हे अनिवार्य नाही आणि अशा फोमचा पुरवठा येथे खूप कमी आहे.



कोणतेही केमिकल न वापरलेल्या फोमला लगेच आग लागते; पण अग्निरोधक वापरलेला फोम लवकर पेटत नाही. आगीपासून संरक्षण करण्यासाठी सीट कव्हरच्या फोममध्ये रसायने जोडली जातात; परंतु भारतात त्याचा धोका खूप कमी आहे.

# वेळेआधी का येतं वार्धक्य?

**आपण कुठे चुकतो?**

माणसाचं वय वाढणारच, वार्ध्यक्याच्या खुणा दिसणारच. सुरकुतलेली त्वचा, पांढरे केस, डोळ्याखालची काळी वर्तुळं ही सर्व वाढत्या वयाची लक्षणं असतात. पण वय वाढण्याची ही प्रक्रिया व्यक्तीगणिक बदलत जाते. काही लोक वयापेक्षा जास्त थोराड दिसतात तर काहीजण वय वाढूनही तरूणच भासत असतात. प्रत्येकाला तरूण रहायचं असतं, दिसायचं असतं. वाढतं वय ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण वेळेआधीच म्हातारे दिसू लागतो. वेळेआधीच वार्धक्याच्या खुणा दाखवणाऱ्या चुका कोणत्या? जाणून घेऊ या.

✽ जंक फूड तसंच गोड पदार्थांचं अतिसेवन घातक ठरू शकतं. ताण आल्यावर किंवा दमल्यावर आपण गोड पदार्थ खातो. साखरेचं अतिसेवन शारीरिक आरोग्याला मारक आहे. शिवाय यामुळे तुमचं शारीरिक वय जास्त दिसू लागतं. गोड पदार्थ सतत खात राहिल्याने त्वचा सुरकुतलेली दिसते. तसंच चेहरा सुजल्यासारखा वाटतो.



✽ केस पांढरे झाले, चेहऱ्यावर सुरकुत्या आल्या, डोळ्यांखाली काळी वर्तुळं आली की ती लपवण्यासाठी आपण सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. या सौंदर्य प्रसाधनांमध्ये घातक रसायनं असतात. उत्पादनं विकत घेताना आपण त्यातल्या घटकांची माहिती घेत नाही. अशा रसायनांचे त्वचेवर दुष्परिणाम होतात आणि आपण म्हातारे दिसू लागतो.

✽ अपुरी झोप वय वाढण्याला कारणीभूत ठरू शकते. प्रत्येकाने किमान आठ तासांची शांत झोप घ्यायला हवी. पुरेशी झोप झाली नाही तर कामात उत्साह वाटत नाही. मरगळल्यासारखं वाटतं. चेहरा दमलेला वाटतो.

✽ मद्याच्या अतिसेवनामुळे आपण वेळेआधी म्हातारे होतो. मद्यामुळे चयापचय क्रिया मंदावते. आरोग्य बिघडतं आणि चेहऱ्यावर वय दिसू लागतं.

✽ प्रत्येकजण स्वत:च्या वैयक्तिक आयुष्यात गुंग झालेला असतो. ऑफिस, घरची कामं यातून सामाजिक आयुष्य जपायला वेळच मिळत नाही. नातेवाईक, मित्रमंडळींसोबत गप्पा होत नाहीत. कुटुंबाला फारसा वेळ देता येत नाही. या सगळ्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत राहतो. आपल्याला ताण येतो. त्यामुळे अधूनमधून मित्रमैत्रिणींना भेटा. नातेवाईकांचं स्नेहसंमेलन आयोजित करा. कुटुंबासोबत बाहेर फिरायला जा. यामुळे तुमचं मन आनंदी राहिल. मन आनंदी असलं की आरोग्यही उत्तम राहिल.

# मूड वारंवार बदलतोय, सावधान!

**डॉ. प्रसन्न नेने**

वारंवार मूड बदलणे धोकादायक असू शकते. रॅपिड मूड स्विंगमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. हे बायपोलर डिसऑर्डर, नैराश्य आणि इतर प्रकारच्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांमुळे असू शकते, म्हणून वेळेवर उपचार करणे आवश्यक आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, मूड स्विंग हा मानसिक विकार नाही. ही समस्या कोणालाही होऊ शकते. अनेकवेळा स्वतःची इतरांशी तुलना करणे, आजूबाजूचे वातावरण आणि हार्मोनल असंतुलन यामुळे या समस्येला वारंवार सामोरे जावे लागते. मासिक पाळी, रजोनिवृत्ती आणि गर्भधारणेदरम्यान महिलांना अनेकदा मूड स्विंग्जमधून जावे लागते. ही समस्या टाळण्यासाठी स्वतःची काळजी घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवा.



मूड स्विंगची लक्षणे नेहमीपेक्षा जास्त बोलणे आणि नंतर अचानक पूर्णपणे शांत होणे, चिडचिड होणे किंवा अतिउत्साही होणे, वाढीव ऊर्जा किंवा तीव्रतेसह ध्येय-केंद्रित क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करणे, नेहमीपेक्षा कमी झोप येणे, रडणे आणि नंतर खूप हसणे ही त्याची लक्षणे आहेत.

मानसिक आरोग्याच्या स्थितीमुळे वारंवार मूड बदलू शकतो. बायपोलर डिसऑर्डरदेखील यापैकी एक आहे. या विकाराला बळी पडल्यानंतर क्षणात आनंदी आणि क्षणात दुःखी वाटू लागते. नैराश्यात जास्त काळ राहणाऱ्यांना जलद मूड बदलण्याची समस्या असू शकते. त्यामुळे डॉक्टर जास्त ताण न घेण्याचा सल्ला देतात. त्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. जलद मूड बदलण्याचे एक कारण हार्मोनल असंतुलनदेखील असू शकते. हार्मोन्सचे काम शरीरातील अनेक प्रक्रिया नियंत्रित करणे आहे.

यात भावनांचाही समावेश होतो. अशा परिस्थितीत हार्मोन्स असंतुलित असतात, तेव्हा मूड बदलू शकतो. थायरॉईडमुळे मूड बदलण्याची तीव्र समस्यादेखील असू शकते. यामुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मूड बदलू लागतो. त्यामुळे थायरॉईडवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# त्वचेला खाज का येते?

**विचारा प्रश्न**

माझी त्वचा सतत खाजत असते. यामुळे मला सतत अस्वस्थ वाटत असतं. त्यातही सांध्यांजवळ म्हणजे गुडघे आणि कोपराजवळची त्वचा जास्त खाजते. दोन आठवड्यांपूर्वी मी डॉक्टरांकडे गेलो होतो. माझ्या हाता आणि पायांच्या वरच्या बाजूला पुरळ उठल्यामुळे मी डॉक्टरांचा सल्ला घेतला होता. मला अर्टिकारिया असल्याचं त्यांनी सांगितलं. मला खूप काळजी वाटत आहे. अशा प्रकारे खाज येणं हे लिम्फोमाचं लक्षण असल्याचं मी वाचलं आहे. मी पिरिटॉन हे औषध घेत होतो. यामुळे मला थोडं बरं वाटत होतं. हे ताणामुळे होतं असंही मी ऐकलं आहे. मला अधूनमधून ताण येतो. तसंच अपुऱ्या झोपेची समस्याही जाणवते. माझी नेमकी समस्या काय आहे? मला मार्गदर्शन करा.




**उत्तर** : तुम्हाला ॲटॉपिक एक्झेमा असल्याचं लक्षणांवरून दिसून येत आहे. त्वचातज्ज्ञाकडून याची तपासणी करून घेणं गरजेचं आहे. ॲटॉपिक टेंडन्सी असलेल्यांना ही समस्या जाणवू शकते. अशा लोकांना ॲटॉपिक डर्मिटिटिस, अस्थमा अशा एकमेकांशी संबंधित विकारांपैकी एक किंवा सर्व विकार होण्याची शक्यता असते. त्यामुळे तुम्ही डॉक्टरांकडे जाऊन नीट तपासणी करून घ्यायला हवी.

**नवसंशोधन**

## ताणामुळे कमी होते स्मरणशक्ती!

मध्यमवयातल्या ताणामुळे भविष्यात विस्मरणाचा धोका उद्भवू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. ताणामुळे मेंदूचा आकारही कमी होतो, असं संशोधकांचं म्हणणं आहे. ताणाशी संबंधित कॉर्टिसोल या हार्मोनच्या अतिप्रमाणामुळे असं होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कॉर्टिसोलचं प्रमाण जास्त असलेल्या लोकांची स्मरणशक्ती इतरांच्या तुलनेत मंदावली होती, असं शास्त्रज्ञांना आढळून आलं. तसंच इतर कामं करतानाही त्यांना त्रास होत असल्याचं दिसून आलं. त्यामुळे मध्यमवयातल्या ताणामुळे बरेच दुष्परिणाम होऊ शकतात, असंच यातून दिसून येतं.



**डोळ्यांचं आरोग्य**

## लेझी आयकडे लक्ष आहे का?

लहान मुलांमध्ये लेझी आयची समस्या असते. यात मुलांचा एक डोळा योग्य पद्धतीने विकसित होत नाही. यावर वेळीच उपचार केले नाहीत तर मेंदूला त्या डोळ्यासमोर दिसणाऱ्या प्रतिमेकडे दुर्लक्ष करायची सवय लागते. यामुळे मुलांच्या दृष्टीला कायमस्वरूपी धोका निर्माण होऊशकतो. या विकाराला अँब्लिओपिया असं म्हटलं जातं. लेझी आयमुळे मुलांना एका डोळ्याने अंधूक दिसतं. तर दुसऱ्या डोळ्याने स्पष्ट दिसतं. अशा वेळी अंधूक प्रतिमेकडे दुर्लक्ष करण्याची सवय मेंदूला लागते. यावर उपचार झाले नाहीत तर दृष्टी अधू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



**दंतारोग्य**

## तोंडाचं आरोग्य आणि रक्तदाब

दात आणि तोंडाचं आरोग्य यांचा संबंध रक्तदाबाशी असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. तोंडाच्या आरोग्याची नीट काळजी घेणाऱ्या लोकांचा रक्तदाब नियंत्रणात असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. तसंच रक्तदाब कमी करणाऱ्या औषधांना त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचंही दिसून आलं आहे. पण गंभीर स्वरूपाचा हिरड्यांचा जंतूसंसर्ग असलेल्यांमध्ये रक्तदाब जास्त असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे तोंडाचं आरोग्य राखणं किती गरजेचं आहे हे आपल्या लक्षात येईल.



**आजीबाईंचा बटवा**

## पोटाच्या समस्यांवर रामबाण उपाय

सणासुदीचे दिवस, लग्नसराई म्हणजे भरपूर खाणंपिणं. यामुळे पोटाचे विकार उद्भवू शकतात. काही आयुर्वेदिक उपायांनी या तक्रारी बऱ्या करता येतात. बडिशेप, तुळस आणि लवंगांच्या एकत्रित सेवनामुळे आम्लपित्ताच्या तक्रारी दूर होऊ शकतात. ताकामुळे आम्लाची तीव्रता कमी होते. बद्धकोष्टतेसाठी सव्वा कप गरम पाण्यात एक चमचा शुद्ध तूप घाला. अर्धा चमचा मीठ घाला. नीट हलवून घ्या. हे पेय हळूहळू प्या. रात्रीच्या जेवणानंतर तासाभराने हे पेयं प्यायल्याने तुम्हाला बरं वाटेल. जुलाब झाले असतील तर दुधी खाता येईल. पोट फुगण्याची समस्या असेल तर गरम पाण्यात बडिशेप किंवा आल्याचे तुकडे घालून ते पाणी प्या.

